# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ४/९/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०८) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **४ सप्टेंबर २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. मधुकर दामोधर सावंत
2. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
3. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
4. श्री. मो. जावेद मो. इसाक
5. श्री. अ. रशीद खान (मामु)
6. श्री. वसंत पांडूरंग नरवडे
7. श्री. संजय रामदास जोशी
8. डॉ. आशा बिनवडे
9. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
10. श्री. पुरूषोत्तम रघुवीरसिंग ठाकुर
11. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
12. श्री. अ. साजेद अ. सत्तार
13. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

श्री.जावेद कुरेशी : संपूर्ण शहरात पुढील तीन दिवस पाणी पुरवठा होणार नाही. असा कोणता प्रश्न उद्‌भवला की, संपूर्ण शहरात नागरीकांना पिण्याचे पाणी मिळणार नाही.

मा. सभापती : संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्य.अभि.(पापु.) : चार दिवसांपुर्वी ढोरकीन पंपहाऊस येथे 700 मी.मी.व्यासाच्या पाईपलाईनला जमीनीखाली लिकेज सुरू झाले. साधारणतः जमिनीच्या खाली तिची लेव्हल 8-10 फुट होती आणि मोठे लिकेज असल्यामुळे आम्ही तात्काळ बंद केले. याबाबत स्थानिक वर्तमानपत्रामध्ये बातमी द्यायचा प्रयत्न केला होता. पाईपलाईनमधून पाणी निघायला साधारणतः 15-21 तास लागले. पाईप हा वरच्या साईडला असल्याने पाईप लाईनमधून पूर्ण पाणी खालच्या भागातून लिकेजद्वारे वाया जात होते. त्यानंतर 3-4 तासात वेल्डींग काम पूर्ण करून पाणी पुरवठा सुरळीत केला. यापुर्वी दोनदा याच ठिकाणी पाईप लाईन लिकेज झालेली होती. जुन्या लिकेजवरून पुन्हा पाणी सुरू झालेले होते. त्याची दुरूस्ती करण्यासाठी आदेशीत करण्यात आले होते. सध्या दोन पंपावरती सुरू आहे. वॉय जंक्शन जो आहे फॅक्टरीमेड करण्यासाची सुचना केलेल्या आहेत. तोपर्यंत पूर्ण 3 पंप सध्या चालू करता येत नाही. दोन पंपावरती पाणी पुरवठा चालू आहे. त्यामुळे सध्या तरी शहराला 2-3 दिवस पाणी पुरवठा

सुरळीत होण्यास विलंब लागेल. कारण की, शटडाऊन करून वॉल पिस घट्ट करावा लागेल.

श्री.हिंमतराव दाभाडे : माझ्या वॉर्डातील वॉर्ड क्र.90 मध्ये द्वारकापुरी येथे अद्यापही जलवाहिनी टाकलेली नाही. यासाठी बजेटमध्ये तरतुद असून तेथील लोकांचे घरे एन-ए, ले-आऊट चे असून नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी घेऊन बांधलेले आहेत. परंतु तेथील नागरीकांची पाण्यामुळे गैरसोय होत आहे. संबंधीत अधिकाऱ्यांशी संपर्क साधले असता असे उत्तर मिळाले की, महानगरपालिकेने असा ठराव घेतलेला आहे की, ज्या वसाहतीत नागरीकांनी बांधकाम परवाना घेऊन बांधकामे केली नसतीलअशा ठिकाणी आम्ही पाणी पुरवठ्यासाठी जलवाहिनी टाकणार नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, या ठिकाणी जेवढे लोक राहतात त्या सर्वांनी एन ए, ले आऊटचे पैसे भरलेले असून बांधकाम परवाना सुध्दा काढलेला आहे. परंतु अद्यापही जलवाहिनी नाही. याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : पाणी असेल तर कुणी टाका. सेल्फ डेव्हलपमेंटचे असेल तर त्यांनी टाकावे अन्यथा आम्ही टाकू. परंतु पाणी देता येते का, ते पाहावे.

श्री.हिंमतराव दाभाडे : त्या ठिकाणी पाण्याची पाईपलाईन आहे. फक्त त्या भागात पाईपलाईन टाकून देणे आवश्यक आहे. केवळ शहरातील एकाच भागात पाईपलाईन नाही. तेथील लोकांना पाण्याची अतिशय आवश्यकता आहे. त्यानुसार मनपाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : पाण्याची गरज लक्षात घेता सेल्फ डेव्हलपमेंट अन्वये त्यांनी स्वतः पाईपलाईन टाकून घ्यावे.

श्री.के.व्ही.मोरे : वॉर्ड क्र.92 मध्ये गेल्या चार महिन्यापासून विद्युत खांब जीआय पोल रोवलेले आहेत. परंतु त्यावरील लाईट चालू केलेले नाहीत. याबाबतचा खुलासा व्हावा. कारण आता धार्मिक कार्यक्रम सुरू होणार आहेत. त्यामुळे रस्त्यावरील लाईट चालू होणे आवश्यक आहे.

कार्य.अभि.(विद्रेइवउ) : सर्वसाधारण सभेत ठरल्यानुसार सर्व लाईटची एकत्रित खरेदी करून सप्लाय करण्याचे ठरलेले आहे. त्यानुसार आपण निविदा काढून, निविदा मंजुरीची संचिका अंतिम टप्प्यात आहे. यामध्ये मा.स्थायी समितीमध्ये मंजुरी झाल्यानंतर मटेरीयल खरेदी करण्यात येईल व संबंधीत गुत्तेदारास डिपार्टमेंटल सप्लाय करून लाईट लावण्यात येतील. सध्या त्यास डिपार्टमेंटल सप्लाय दिलेले नाही. प्रकरणी टेंडर कॉल करून निविदाची संचिका अंतिम मंजुरीसाठी आहे. येणाऱ्या स्थायी समितीमध्ये ठेवण्यात येईल.

श्री.संजय शिरसाट : महानगरपालिकेत ई-टेंडरींग पध्दत सुरू झालेले आहे. त्याचा काही फायदा झालेला आहे किंवा नाही. मा.आयुक्त यांनी सांगितले की, दुसऱ्या दिवशीच वर्क ऑर्डर मिळते. सर्व टेंडर प्रोसेसला मग आणखी किती कालावधी लागणार.

श्री.संजय जोशी : ई-टेंडरींग मुळे निविदा प्रक्रीया लवकर होतात. बाकीच्या प्रोसेसिंगला आहे तोच वेळ लागतो.

श्री.हिंमतराव दाभाडे : वॉर्ड क्र.90 मध्ये शाह कॉलनी आहे या कॉलनीच्या बाजुला सह्याद्री कॉलनी आहे. या ठिकाणी मनपातर्फे इमारत उभी करून ठेवलेली आहे. सदरची इमारत ही मनपाने दवाखान्यासाठी बांधलेली आहे. परंतु आज या इमारतीचा कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नाही. काही व्यक्ती त्या इमारतीचा गैरवापर करतात. म्हणून मी सांगितलेले आहे की, त्या ठिकाणी लोकसंख्या जास्त आहे. त्या ठिकाणी दवाखाना

काढण्यात यावा. तेव्हा डॉ.कुलकर्णी, आ.वैद्य.अधि. यांचेकडून उत्तर मिळते की, सध्या आमच्याकडे अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. तेव्हा आपणास असे करावयाचे नव्हते तर दवाखान्याची इमारत का बांधण्यात आली? या ठिकाणी मनपाने कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देवून त्या ठिकाणी दवाखाना चालू करण्यात यावा.

मा. आयुक्त : गेल्या 7-8 महिन्यापुर्वी आम्ही सर्वसाधारण सभेत असा प्रस्ताव ठेवलेला होता की, जे एमबीबीएस डॉक्टर आहेत त्यांना घेणे बाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. परंतु अद्यापही नविन डॉक्टर्स आलेले नाहीत. तरीही आपल्याकडे RCH चे फेज दोन मध्ये 8-9 डॉक्टरांची पदे मंजूर झालेले आहेत. त्या संदर्भात मुलाखती वगैरे झालेल्या आहेत. त्यात नविन ॲक्टमुळे आरक्षणा बाबत लागु करावा किंवा नाही हा प्रश्न प्रलंबीत होता. त्याची माहिती आलेली आहे. आता या महिनाअखेर पर्यंत स्टाफ उपलब्ध होईल. त्यामुळे 6-7 जागेवर नविन हॉस्पीटल सुरू होईल.

डॉ.आशा बिनवडे : मागील बैठकीत मी दोन प्रश्न सभागृहात विचारणा केलेली होती. त्यामध्ये काही सूचना मा.आयुक्त यांनी दिलेल्या होत्या. महानगरपालिकेची जवाहर कॉलनीची जी शाळा आहे त्या शाळेचा स्लॅब काही ठिकाणचा पडायला आलेला आहे. त्याची कार्यवाही कोठपर्यंत आली. ज्याला आपण इमर्जन्सी म्हणतो ती किती दिवसाची आहे. दुसरा प्रश्न म्हणजे 227-228 ही जागेची आरक्षण आहे. त्रिमुर्ती चौकाची जिथे आपली भाजी मंडई बांधून पडलेली आहे. तर 228 या आरक्षणात खरेदी विक्रीचा व्यवहार झाला आहे असे मी मागील वेळेस म्हटले होते. तर त्याचा सर्च रिपोर्ट आपण करणार होता. गेल्या दोन अडीच वर्षापासूनचा चालू आहे. तर त्याचा कार्य रिपोर्ट आला आहे. पीआर कार्ड आपल्या नांवे आहे काय? 228 आरक्षीत असलेली जागा आपल्या नांवे आहे काय? नसेल तर का नाही.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता(वि.ड्रे.इ व उ) यांनी माहिती द्यावी.

कार्य.अभि.(ड्रेविइवउ) : स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या भागातील शाळेच्या स्लॅब बाबत 67(3)(c) मध्ये मा.आयुक्त यांची मंजुरी घेतली आहे. सदरील संचिका वॉर्ड अभियंता श्री.निकम यांचेकडे पाठवून तातडीने काम करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री.हिंमतराव दाभाडे : गेल्या दोन वर्षापासून मी प्रश्न विचारतो आहे. माझ्या प्रश्नाला सहजपणे बगल दिली जाते. याचा मी खेद व्यक्त करतो. मुथीयान कॉर्नर येथे माधव घोरपडे या व्यक्तीने मनपाच्या जागेवर बिल्डींग बांधलेली आहे. या जागेच्या संदर्भात कोणताही मोबदला घेतलेला नाही. असे सांगण्यात येत होते. परंतु त्यांनी मोबदला घेतलेला आहे म्हणून चेक घेतलेला आहे. त्याचा नंबर दिलेला आहे. त्यांनी मोबदला घेतलेला नाही म्हणुन त्यांनी पत्र लिहिलेले आहे. त्या पत्राची प्रत सुध्दा दिलेली आहे. तरी सुध्दा अशा व्यक्तीला पाठीशी घालण्याचा इथले प्रशासन प्रयत्न करीत आहे याचा खुलासा पाहिजे.

मा. आयुक्त : या प्रकरणात आम्ही सुनावणी घेतलेली होती. सुनावणीत स.सदस्य उपस्थित होते. परंतु श्री.घोरपडे आलेले नव्हते.गेल्या 16 ऑगष्टला कोर्टात हजेरी असल्यामुळे ते आलेले नव्हते. दुसरे असे की, ह्या केसमध्ये कोर्टाचा स्टे आहे. स.सदस्यांनी असे सांगितले की, पुर्वी मोबदला देण्यात आलेला आहे. या बाबत पुढील तारखेस कोर्टात मनपातर्फे संबंधीत वकीलांनी बाजु मांडावी व योग्य ते आदेश घ्यावेत.

श्री.हिंमतराव दाभाडे : या ठिकाणी कोर्टाचा स्टे आलेला आहे असे सांगितले. तेंव्हा कोर्टाचा स्टे असतांना बांधकाम करता येते का? तो व्यक्ती त्या जागेवर बांधकाम करतो त्यास आपण काय करणार.

मा. आयुक्त : या सर्व बाबी आपण मा.कोर्टात आली बांजु मांडू व आदेश घेवू. जर बांधकाम चालू असल्यास स्पेशल अप्लीकेशन मुव्ह करून कोर्टाचा आदेश घेवु.

श्री.संजय शिरसाट : सदरील प्रकरणात स्टे काय म्हणुन आहे. विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार : या प्रकरणात श्री.घोरपडे यांनी स्टे घेतलेला आहे. त्या ठिकाणी त्यांच्या बांधकामाला बांधकाम परवानगी दिलेली होती. तेंव्हा त्यांनी कोर्टाला सादर केले. बांधकाम पाडू नये म्हणून अंतिम निर्णय होईपर्यंत निर्णय दिला.

श्री.संजय शिरसाट : विधी सलागार यांनी नियमाप्रमाणे माहिती द्यावी. संबंधीत व्यक्तीने बांधकाम परवानगी घेतलेली आहे. मग बांधकाम पाडू नये म्हणुन कोर्टात स्टे मागवून घेतलेला आहे.

मा. आयुक्त : स.सदस्य यांनी सुचना केल्याप्रमाणे प्रकरणी पुन्हा एकदा वाचून वस्तुस्थिती काय आहे ते पहावे. त्यांना बांधकाम करता येत नसेल तर, त्या ठिकाणी जावून फोटोग्राफ घ्यावेत. मुव्ह करून कोर्टात दाखल करावे आणि कोर्टाकडून आदेश घ्यावेत.

श्री.अ.साजेद : श्री.घोरपडे यांना बांधकाम परवानगी दिली ती लिगली आहे काय? त्यास पैसेही दिले व बांधकाम परवानगीही दिली. तेंव्हा बांधकाम परवानगी रद्द करावयास पाहिजे. जर मनपाने बांधकाम परवानगी दिली नसती तर कोर्टाने स्टे दिला नसता. सदरील व्यक्तीस पैसे दिले, मनपाने जागा देवून बांधकाम परवानगीही दिली हे कसे काय? कोर्टाने बांधकाम परवानगी असल्याने स्टे दिलेला आहे. परंतु मनपाने मोबदलाही दिला व बांधकाम परवानगीही दिली त्यामुळे मोबदला दिलेला असल्याने बांधकाम परवानगी मनपाने रद्द का केली नाही. तोपर्यंत तो व्यक्ती बांधकाम करीत राहील व जागाही मनपाची राहणार नाही.

मा. आयुक्त : कोर्टात वस्तुस्थिती सादर करणे आवश्यक आहे की, सदरील व्यक्तीने जागेचा मोबदला घेतलेला आहे व पुन्हा त्याच जागेवर बांधकाम परवानगी घेतली. त्यामुळे कोर्टात सादर करूनच कार्यवाही करणे उचित होईल. त्यामुळे मा.कोर्टात सिव्हील अप्लीकेशन करून वस्तुस्थिती दाखवून प्रकरण काढावे लागेल.

श्री.अ. साजेद : सदरील व्यक्तीने मनपाकडून मोदबलाही घेतला व बांधकाम परवानगीही मिळवून घेतली. त्यामुळे खोटे दस्तावेज तयार करून मनपाची फसवणूक केलेली आहे. पोलीसात गुन्हा दाखल करावा.

मा. आयुक्त : कोर्टात सर्व परिस्थिती समजावून सांगुन कोर्टामार्फत प्रकरण निकाली काढावे लागेल.

डॉ.आशा बिनवडे : प्रशासनाला असे वाटते काय की, श्री.घोरपडे यांनी फसवणूक केली म्हणुन.

श्री. संजय जोशी : या प्रकरणात आपल्याला चौकशी करावी लागेल. यामध्ये 15% ची 10% करून जागा दिलेली आहे. आणखी कशी दिली. एक्सेस जी जागा होती त्याच्यामध्ये दिली याची चौकशी होणे आवश्यक आहे. प्रथमतः परवानगीची संचिका मा.आयुक्त यांचेकडे मागवून घ्यावी. 15% वरून 10% ची जागा आहे. त्यातील 5% जी जागा आहे. त्यातील परवानगी आहे की, त्याचा संपूर्ण ले-आऊट आहे. माझ्या मते एक्सेस जागेवरती परवानगी आहे. त्याप्रमाणे असेल तर, प्रशासनाच्या विरोधात जाऊन संबंधीत अधिकारी यांनी बांधकाम परवानगी दिलेली आहे. तेव्हा संचिका मागवून चौकशी करणे आवश्यक आहे. एक्सेस जागेबाबत 2-5 वर्षापुर्वी स्थायी

समितीकडून ठराव घेवुन मंजुरी घेतलेली आहे. तेंव्हा वस्तुस्थिती समोर येऊ द्या. मग खरे काय आहे ते कळेल. यासाठी मा.आयुक्त यांनी गांभीर्याने घेऊन संचिका मागवून प्रकरण निकाली काढावे व सोक्षमोक्ष करावा. हा विषय अर्ध्या तासातच संपवावे. पुन्हा स्थायी समिती समोर या बाबत चर्चा होऊ नये. त्या ठिकाणची एक्सेस जागेची मा.आयुक्त यांच्या परवानगीने मंजूरी दिलेली आहे का? यासह सविस्तर माहिति पुढील बैठकीत माहिती द्यावी.

डॉ.आशा बिनवडे : ज्या काही सुचना आहेत त्या स.सदस्यांना बोलावून संबंधीत अधिकारी यांचे सोबत चर्चा घडवून एकत्रित रित्या संचिका मागवून प्रकरण मिटवावे. आणि प्रशासन व पदाधिकारी, स.सदस्यांमधील शंका दूर कराव्यात व त्यानंतरच सभागृहात अहवाल सादर करावा. तसेच माझ्या प्रश्नाचे उत्तर मला अद्याप मिळालेले नाही. आरक्षण क्र.228 मध्ये वस्तुस्थिती काय आहे आणि काय कार्यवाही करणेत आली. याचा खुलासा मिळणे आवश्यक आहे.

श्री. संजय जोशी : सध्या महानगरपालिकेतील सहा.संचालक नगर रचना हे सक्षम अधिकारी असून ते या बैठकीस उपस्थित नाहीत. याचे कारण काय? स.सदस्या डॉ.बिनवडे यांनी आरक्षण क्र.228 बाबत प्रश्न विचारणा करूनही एकही अधिकारी या ठिकाणी उपस्थित नाही, याचे कारण काय? स्थायी समिती बैठकीस सर्व विभाग प्रमुख उपस्थित राहतात परंतु सहा.संचालक नगर रचना उपस्थित राहत नाही ही बाब योग्य वाटत नाही. जर उपस्थित रहावयाचे नसल्यास एखादा अर्ज मा.सभापती यांचेकडे पाठवावा. याची तसदी सुध्दा संबंधीत अधिकारी घेत नाही आणि अशा प्रकारचे वागणे अशा अधिकाऱ्यांचे असल्यास मा.आयुक्त सुध्दा खपवून घेतात व सभागृहात उत्तरे द्यावयास कुणीही नसतो. त्यापेक्षा शासनाकडून सक्षम अधिकारी तातडीने मागवावा व सध्या कार्यरत अधिकारी ज्यांचेकडे चार्ज आहे त्यांना पुढील बैठकीपासून उपस्थित राहण्याच्या सुचना द्याव्यात.

मा. आयुक्त : शासनाकडे सहा.संचालक नगर रचना या पदावर अधिकारी पाठविणे बाबत मागणी केलेली आहे. सदरील पदाची प्रतिनियुक्ती लवकरात लवकर करावी असे पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. संचालक नगर रचना पुणे हे आल्यामुळे ते आलेले नाहीत. परंतु त्यांनी कार्यालयास व मा.सभापती यांना माहिती देवून कळविणे आवश्यक होते.

श्री.संजय जोशी : सध्या प्रशासन सक्षम व्हावे अशी आमची इच्छा आहे. कारण पंधरा वीस दिवसातून स्थायी समितीची सभा असते. त्यास विभाग प्रमुखांनी शक्य तो उपस्थित रहावे असे आम्हाला वाटते. म्हणजे काही प्रश्नांची उत्तरे सभागृहात तातडीने मिळू शकतात. सध्या त्या पदाचा तरी एखादा व्यक्ती प्रशासनाने मागवावा. मा.आयुक्तांनी एक दोन दिवसांत बांधकाम परवानगी मिळेल अशी घोषणा केली होती. यास कितपत चालना मिळेल. कारण प्रशासनाची प्रक्रियाच मोठी आहे. तेव्हा मा.आयुक्त यांना विनंती की, सध्याचे सहा.संचालक नगर रचना यांना एक तर बैठकीस उास्थित राहावयास सांगावे अन्यथा आजच्या आज चार्ज सोडून द्यावयास सांगावा.

मा. आयुक्त : प्रशासनातर्फे शासनाकडे लिखीत स्वरूपात मागणी केलेल आहे की, आम्हाला पूर्णवेळ सहा.संचालक नगर रचना पदावर अधिकारी नियुक्त करावे. तेव्हा येत्या 10-12 दिवसांत सहा.संचालक नगर रचना व मुख्य लेखा परिक्षक या दोन्ही पदावर अधिकारी येतील अशी अपेक्षा आहे. आज संचालक नगर रचना हे दौऱ्यावर

आलेले असल्याने ते उपस्थित झालेले नाहीत. तरीही त्यांनी मा.सभापतींची परवानगी घ्यावयास पाहिजे होती.

श्री.हिंमतराव दाभाडे : मागील बैठकीत बऱ्याच वेळेस आम्ही अतिक्रमणावर चर्चा केलेली आहे. माझ्या वॉर्डातील पीरबाजार, एकनाथनगर, नागसेननगर येथील अतिक्रमण आतापर्यंत का हटविण्यात आलेले नाही याचा खुलासा करावा.

प्र.प्रशासकीय अधिकारी : पीरबाजार येथील अतिक्रमण हटविणेच्या संदर्भात दि.7/8/07 रोजी पोलीसांचे पथक मागणी केलेले होते. परंतु पोलीस विभागाकडून त्यावेळी पथक मिळू शकलेले नाही. त्यामुळे ती प्रक्रिया थांबलेली आहे. तेव्हा पोलीस विभागाकडून पथक उपलब्ध होताच ती कार्यवाही करणेत येईल.

श्री.हिंमतराव दाभाडे : अशा प्रकारचे उत्तर देणे व सभागृहाची दिशाभूल करणे मला योग्य वाटत नाही. तेव्हा आपण कुणाच्या तरी दबावात येत आहात असे मला वाटते.

प्र.प्रशासकीय अधिकारी : त्या ठिकाणी अतिक्रमण आहे ते काढावे लागेल. यासाठी कुणाचाही दबाव नाही. परंतु त्या ठिकाणी असलेले शेड काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त लागतो. आपण पोलीस स्टेशनला पत्र दिलेले आहे की, आम्हाला पोलीस बंदोबस्त करणेसाठी पोलीसांची आवश्यकता आहे. आपल्याकडे जे पोलीस आहेत त्यापैकी 14 पोलीस अगोदरच बदल्या होऊन गेलेले आहेत. सध्या 6 पोलीसच उपलब्ध आहेत. त्यांचेकडून हे काम करून घेणे शक्य नाही. म्हणुनच आपण पोलीस आयुक्तांना पत्र दिलेले आहे की, आम्हाला पोलीस उपलब्ध करून द्यावेत.

श्री.संजय शिरसाट : अतिक्रमणाबाबत अनेक स.नगरसेवकांच्या वॉर्डातील तक्रारी असतात. या अतिक्रमणा संदर्भात शासनाचा जी.आर. असा आहे की, जर एखाद्या नगरसेवकाने अतिक्रमणा बाबत हस्तक्षेप केल्यास त्याचे नगरसेवक पद रद्द होते. संबंधीत वॉर्ड अधिकारी व पोलीस स्टेशनचा पोलीस निरीक्षक यांचेवर गुन्हे दाखल होऊ शकतात. प्रशासनामार्फत पोलीसांकडून बंदोबस्त घेऊन अतिक्रमण काढणे आवश्यक आहे. अशा अतिक्रमणासाठी पोलीस बंदोबस्त जर मिळाले नाही तर पोलीसांचा त्या अतिक्रमणाला प्रोत्साहन मिळाले असा त्याचा अर्थ होतो. तेंव्हा शासनाकडून जो जी.आर. आलेला आहे तो पोलीस आयुक्त यांना दाखवावा व अशा अतिक्रमणाच्या प्रकरणात पोलीस बंदोबस्त मिळणे कसे आवश्यक आहे ते जी.आर.ची प्रत जोडून निदर्शनास आणून द्यावे. आणि पोलीस बंदोबस्ता नुसारच पुढील कार्यवाही करावी.

श्री. संजय जोशी : प्रशासनाने जे रेकॉर्ड आहे ते सर्व वेबसाईटवर लोड केले आहे व काहीची प्रक्रिया चालू आहे. त्यातील नगर रचना विभागातील काही संचिका मी पाहिल्या त्यामध्ये काही संचिकावर सबमीशन पेपरवन कनिष्ठ अभियंता यांची सही, उप अभियंता यांची सही, सहा.संचालक नगर रचना यांची सही व त्यानंतर मा.आयुक्त यांची सही झालेली आहे. या सर्व गोष्टी जनतेसमोर आलेल्या आहेत. तेव्हा माझी विनंती की, आज आपण वेबसाईट ऑन करून 2-3 संचिका पहाव्यात व वाचन करावे तेव्हा असे लक्षात येईल की, कशी फसवणूक झालेली आहे ते आपल्या लक्षात येईल. हे सर्व आम जनतेच्या समोर गेलेले आहे. आज मी माझ्या घरात वेबसाईट ओपन करून बघता येते. म्हणुनच मी आज सभागृहात बोलत आहे. नगर रचना विभागातील एका संचिकेत आपण पूर्णपणे चुकीची परवानगी दिलेली आहे आणि त्यावर मा.आयुक्त यांची स्वाक्षरी आहे. तेव्हा प्रशासनाने याची दखल घ्यावी आणि संचिका अशाच प्रकारच्या असतील तर कृपया वेबसाईटवर देवू नका. त्यामुळे

प्रशासनाची चुकीची लक्षणे बाहेर येण्याचे काम आहे. तेव्हा गुपीतराहू द्या. प्रकरण वेबसाईटवर पाहून पुढील बैठकीत अहवाल द्यावा.

मा. आयुक्त : आपण वेबसाईटवर काही संचिका व कामे यासाठी टाकल्या की, ते चोरी होऊ नये. परंतु लोकांसाठी झालेली कामे ते तातडीने मिळावे म्हणुन हे केलेले आहे. लोकांचे कामे काढलेले आहेत. पुन्हा चुका होऊ नयेत. आज आपली चूक बाहेर आली ते अतिशय चांगले आमच्यासाठी झाले आहे. त्यामुळे चुकांच्या दुरूस्त्या करणेत येतील. सन 1982 पासून आजपर्यंत जेवढे लिगली ठराव झालेले आहेत कारण ते खुलेआम चर्चा असल्याने ते लोकांचे माहितीसाठी आहे. तेव्हा आता 2 वर्षाचे वेबसाईटवर टाकून झालेले आहे आणि आता 10-15 दिवसांमध्ये वेबसाईटवर टाकण्यास सुरूवात करू. तेव्हा सर्व मिनिटस् वेबसाईटवर टाकालायला सहा सात महिने लागतील. परंतु ते टाकल्यानंतर सर्व जनतेला सभागृहातील चर्चा व ठराव काय काय झाले ते बघायला मिळतील. जवळपास डिसेंबर पर्यंत सर्व इतिवृत्त व ठराव वेबसाईटवर येतील.

श्री.हिंमतराव दाभाडे : एकनाथनगर शाळेत फर्निचर नाही. त्यामुळे खाली बसून शिकविल्या जाते याबाबत प्रशासनाने नोंद घ्यावी.

मा. आयुक्त : टेंडर कॉल केलेले आहे. त्याची प्रोसीजर चालू आहे.

श्री.हिंमतराव दाभाडे : फर्निचर देणार किंवा नाही देणार, आणि देणार तर कधी देणार. विशेष म्हणजे सन 2005-06 मध्ये शाळेतील खोल्यांमध्ये स्लॅब गळती होत आहे. त्या ठिकाणचे कंपाऊंड वॉल नाही. त्यासाठी संचिका दाखल झालेली आहे. तेथील कामाचे बाबतीत त्या कंत्राटदाराचे काम व्यवस्थीत नसल्याने काळ्या यादीत त्याचे नांव आहे. तेव्हापासून दुसऱ्या कंत्राटदाराकडून ते आजपर्यंत काम करवून घेणे आवश्यक होते. ते का करून घेण्यात आले नाही? एकाच कामासाठी दोन तीन वर्ष जर लागत असतील तर ते काम कसे शक्य आहे. दुसरा एक मुद्दा आहे फुलेनगर येथील बाजारात एका कंत्राटदारास काम दिले होते ते त्यांनी केलेले नसल्याने त्यास काळ्या यादीत टाकलेले आहे. तेथील काम रिकॉल केलेले आहे. तो ही कंत्राटदार काम व्यवस्थित करीत नाही. तेव्हा अशा प्रकारे दोन-तीन वर्ष जर कामे होत नसतील तर तुम्ही टेंडर का काढता? विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन पट्ट्या वगैरेची कामे अद्यापही होत नाहीत त्यामुळे खेद वाटतो.

मा. सभापती : एकनाथनगर शाळेत फर्निचर बाबत टेंडर कॉल झालेले आहे. दुसरा मुद्दा गटार बाबत जो गुत्तेदार आहे त्यास संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतात की, संबंधीत गुत्तेदारास तातडीने काम करण्यास सांगावे. आणि जर तो गुत्तेदार काम करीत नसल्यास काळ्या यादीत त्याचे नांव टाकावे.

श्री.संजय शिरसाट : महानगरपालिकेच्या इतिहासात एक नविन घटना घडली. गेल्या चार-पाच दिवसांपुर्वी माझ्या हातात काही गादपत्रे आहेत. आपण महानगरपालिकेमध्ये, सर्वसाधारण सभेमध्ये जमिन भूसंपादनाचे काही प्रस्ताव देत असतो. 127 ची नोटीस दिली म्हणजे त्यांचे भूसंपादन करणे अनिवार्य ठरते. त्याबाबतचा ठराव घेतला नाही तरी आरक्षण रद्द होऊन बांधकाम परवानगी मनपामार्फत मिळते असा एकंदरीत नियम आहे. या नियमानुसार आपण गेल्या वेळेस एका मान्यवराने 127 ची नोटीस दिली. नोटीस दिल्यानंतर ताबडतोब आपण जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविले व जिल्हाधिकारी कार्यालयाने सुध्दा इतक्या तत्परतेने काम केले आणि त्या जागेचे भूसंपादन केले. त्या जागेची सध्याची किंमत 1.25 कोटी रूपये मनपाने

संबंधीत व्यक्तीला नंदलाल गुणवानी व श्री. साळुंके यांना देऊ केले. त्या व्यक्तींना रू.1.25 कोटी दिल्यानंतर संबंधीत व्यक्तींनी असा विचार केला की, बरे झाले एकदाचे म्हणून त्यांनी उप आयुक्त, मनपा औरंगाबाद असे नांव लावून टाकले. गुणवानी यांनी जवळपास 80 लाख रूपये घेतले. आणि दुसरे व्यक्ती श्री.साळुंके यांनी जवळपास रू.35.00 लाख घेतले. हे सर्व घेतल्यानंतर त्या जागेचा मूळ मालक आहे जगदिश गिरी पिता कांचनगिरी विश्वस्त मठाधिश आहे. ही ट्रस्टची जागा आहे. त्या व्यक्तीने 2004 मध्ये मा. आयुक्त, विभागीय आयुक्त यांचेकडे आणि मंत्री महोदयांकडे अर्ज दिले. परंतु सदरील व्यक्तीने केलेल्या अर्जावर तो वेडा आहे किंवा संगनमताने त्यास कळत नाही असे समजून त्यास दाद मिळाली नाही. त्यांनी सन 2003 ला लोकशाही दिनात अर्ज करूनही त्याच्या अर्जाकडे दुर्लक्ष केल्या गेले. त्यांनी सांगितले की, रजिस्ट्रीबाबत या बाबतचा बोगस ठराव येणार आहे. त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी आदेश दिलेला आहे की, श्री.साळुंखे यांना वाटप केलेली जागेचा मोबदला 23,28,493/- एवढी रक्कम त्यांचेकडून वसूल करणे योग्य वाटते, सन 2003 मध्ये असा निर्णय दिलेला आहे. तोपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती. मात्र 14/9/2005 रोजी महानगरपालिकेने जागेची रजिष्ट्री करून घेतली. त्यामध्ये उप आयुक्त, महानगरपालिका हे नांव त्या जागेवरून रद्द झालेले आहे. ज्यावेळेस संबंधीत व्यक्ती महानगरपालिकेच्या कार्यालयात वेळोवेळी येऊन सांगत होता, त्यावेळी त्याचे कुणीही ऐकून घेत नव्हते. संबंधीत लोकांनी त्या व्यक्तीवर पोलीसात गुन्हा दाखल केला व मारहाण केली आणि दातही पाडले. तो विश्वस्त म्हणुन असतानाही तो व्यक्ती फरार असून भूमिगत म्हणून शहरात वावरत आहे. तो यासाठी की, माझे म्हणणे कुणी तरी ऐकून घ्यावे. तेंव्हा महानगरपालिकेने ज्या दोन व्यक्तींना रू.1.25 कोटी जागेच्या भूसंपादनापोटी दिलेली आहे. मात्र ती फसवणूक झालेली असून आपण कार्यवाही कोणती केली याची माहिती द्यावी. किंवा सदरील प्रकरण आपल्याकडे अद्यापही आलेले नाही का? याची माहिती मा.आयुक्त यांनी द्यावी.

मा. आयुक्त : सदरील माहितीच्या प्रकरणात शासनाकडून जमाबंदी आयुक्तांकडून आदेश झालेले आहेत की, गेल्या 15-20 वर्षातील सर्व अशा प्रकारचे व्यवहार रद्द केलेले आहेत. मठातील विश्वस्त व्यक्ती मागील रविवारी मला प्रत्यक्षात येऊन भेटला. मला माहिती सांगितली आणि त्यांनी सांगितले की, मला दुसऱ्याच्या समोर येवुन भेटायचे नसून एकटा येऊन माहिती देतो. त्यावेळी त्यांनी सांगितले की, माझ्या बाजूने निर्णय झालेला आहे. आणि मनपाचे पी.आर.कार्डवरील नांव रद्द झाले आहे. तेव्हा त्याच दिवशी रविवारी माझे अधिकारी यांना बोलावून सांगितले की, जो आदेश झालेला आहे त्याची प्रत मागवा. 31 जुलै किंवा 31 ऑगष्ट 2007 रोजी आदेश झालेला आहे. त्यानुसार आम्ही महानगरपालिकेने जे भूसंपादनापोटी पैसे दिलेले आहेत ते परत घेऊ आणि कोर्टात सांगु की हे पैसे कोर्टात जमा करून घ्यावे. आणि जी जमीन आहे ती महानगरपालिकेच्या मालकीची आहे. ह्या जागेत मनपातर्फे चालविल्या जाणाऱ्या एएमटी बसेस उभ्या राहतात ते आहे आणि सदरील जागा ही नाल्याला लागून आहे. तर ही जागा सध्या महानगरपालिकेच्या मालकीची आहे. आणि ज्या जागेवर महानगरपालिकेचे नांव पीआर कार्डवर रद्द केलेले आहे त्यावर पुन्हा महानगरपालिकेचे नांव लावून घ्यावे. ज्या दोन व्यक्तींना पैसे मनपाने दिलेले आहे ती रक्कम संबंधीताकडून वसूल करून कोर्टात जमा करणे. जमीन मनपाच्या

मालकीची राहील. कोर्टाचा आदेश आताच झालेला आहे. त्यामुळे आदेशाची प्रत घेऊन कार्यवाही करण्यात येईल. याबाबत मी मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचेशी माझे प्रत्यक्षात बोलणे झाले नाही. परंतु मला मेसेज आला की, संबंधीत व्यक्तीने आयुक्त, मनपाला भेटावे. त्या प्रकरणात आयुक्त कार्यवाही करतील. तेव्हा या प्रकरणात आपण संबंधीतांकडून दिलेले पैसे वसूल करण्याची कार्यवाही करू. ते पैसे कोर्टात जमा करून घेऊ व जमीन महानगरपालिकेच्या नांवे असणे आवश्यक आहे.

श्री.संजय शिरसाट : हे प्रकरण इतके सोपे आहे का? की, श्री.गुणवानी व साळुंखे यांच्या घरी मालमत्ता अधिकारी यांना पाठविले तर श्री.गुणवानी म्हणतील हो हे घ्या तुमचे पैसे व ते पैसे आपण घेणार आणि कोर्टात जमा करणर. म्हणजे इतके सोपे प्रकरण आहे का? वसूलीची पध्दत अशी आहे की, दि.28/8/2007 रोजी पी.आर.कार्डवरसंबंधीताचे नांव आलेले आहे. म्हणजे आता ती जागा महानगरपालिकेचे राहिलेली नाही. कोणत्याही जागेचा ताबा हा मालकी हक्काशिवाय दाखविता येत नाही. सध्या महानगरपालिकेची जागेवर मालकीच नाही. तेव्हा ताबा असण्याचा प्रश्नच नाही. महानगरपालिका खोटी तक्रार कशी करणार. सध्या त्या जागेवर बसेस उभ्या राहतात परंतु मालकी ही त्याच व्यक्तीची आहे. त्याबाबतचा पुरावा माझेकडे जी कागदपत्रे आहेत ते पहावे.(सभागृहात कागदपत्र दाखवितात). तेव्हा या प्रकरणात श्री.नंदलाल गुणवानी व श्री.साळुंखे यांचेवर फसवणूक केली म्हणुन महानगरपालिकेने गुन्हा दाखल करावयास पाहिजे. त्याचप्रमाणे पीआर कार्डवर देखील महानगरपालिकेचे नांव रद्द होऊन संबंधीत व्यक्तीचे नांव आलेले आहे. आणि ते आदेश मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येतात. त्याची प्रत आपल्याही कार्यालयाकडे येते.

मा. आयुक्त : अगोदर कोर्टाच्या आदेशाची प्रत मागवून फसवणूक केल्या प्रकरणी महानगरपालिकेतर्फे गुन्हा कसा दाखल करावयाचा ते 8-10 दिवसांत ठरवू आणि संबंधीतांकडून दिलेल्या पैशाची वसूली करून कोर्टात जमा करू. त्यावरही ऐकले नाही तर त्यास नोटीस बजावून त्याची प्रॉपर्टी सिल करावी लागेल.

श्री. संजय शिरसाट : आपण कार्यवाही कराल, प्रश्न तो नसून ज्यावेळेस जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आदेश प्राप्त होतात तेंव्हा भूसंपादना बाबतची एक प्रत भूसंपादन अधिकारी व एक प्रत महानगरपालिका यांचेकडे येते. त्याची प्रत महानगरपालिकेकडे आलेली असल्याने ती प्रत संबंधीत अधिकाऱ्यांनी आपणांस दाखविली किंवा नाही. नसेल तर का दाखविली नाही? जेव्हा भूमी अभिलेख कार्यालयाकडे प्रत गेल्यानंतर त्या कार्यालयाने पीआर कार्डवरचे नांव रद्द करून टाकले आणि आदेशा प्रमाणे त्यांचे नांव टाकले. तेव्हा कार्यवाही करणेसाठी किमान दोन आठवड्याचा अवधी निश्चित लागतो. या बाबतचे प्रकरण लोकशाही दिन मध्ये आलेले होते आणि संबंधीताना कार्यवाही करावयाचे झाल्यास नोटीस बजावून पुढील कार्यवाही करणे आवश्यक ठरते. कारण भूमी अभिलेख कार्यालयाने एक प्रत महानगरपालिकेला दिलेली असेल. ती प्रतसंबंधीत अधिकारी यांनी वरीष्ठांना का दाखविली नाही, याचा खुलासा व्हावा. एखाद्या प्रॉपर्टीवरील नांव वगळावयाचे असल्यास नियमाप्रमाणे नोटीस द्यावी लागते.

मा. आयुक्त : यामध्ये दोन इश्यु आहेत. जर आपण कोर्टाच्या किंवा कुणाच्या आदेशान्वये बदल करतो तर त्यास नोटीस देत नाही. परंतु त्याबाबत आदेश मिळाला होता काय? ते

पाहून घेवु. सध्या तरी कोर्टाच्याआदेशाची प्रत घेणे व वसूलीची प्रक्रिया सुरू करणे हे या आठवड्यात पूर्ण करू.

श्री.संजय शिरसाट : माझा मूळ मुद्दा आहे ते आपण समजून घ्यावा. कारण या जमिनीच्या प्रकरणात श्री.गुणवानी किंवा साळुंके हेच दोषी आहेतका? या प्रकरणात महानगरपालिकेतील संबंधीत विभागाचे अधिकारी, कर्मचारी ज्यांनी हे प्रकरण हाताळले ते नाहीत का? तेव्हा या प्रकरणातील 1.25 कोटीच्या आर्ïिाक व्यवहारात कोण आहेत याचा खुलासा करून आपण कोणती कार्यवाही करणार याची माहिती द्यावी. कारण आपले अधिकारी हे संबंधीत व्यक्तीकडे गेलेले होते. तेंव्हा त्यांनी सांगितले की, आजपर्यंत महानगरपालिकेचे 1500 केसेस कोर्टात पेंडींग आहेत आणि आता ही एक केस म्हणजे 1501 होईल. काय फरक पडतो. तेव्हा या प्रकरणात प्रशासनातील अधिकारी आहेत हे दिसून येते. अशा पध्दतीने महानगरपालिकेतील कारभार चालू असेल आणि मालमत्ता विभाग झोपलेला असेल तर मनपाची परिस्थिती काय होणार. त्याचप्रमाणे सदरील प्रकरण हे लोकशाही दिनात असल्याने त्याची पत आपल्याकडे आलेली नाही का? आपण ती वाचलेली नाही का? या प्रकरणाचे गांभीर्य प्रशासनाने घेतलेले दिसत नाही. प्रकरणातील निवाडा आपण पाहिलेला नाही.

मा. आयुक्त : आपण म्हणता ते पूर्ण बरोबर आहे. यामधील संचिका आहे या प्रकरणात पूर्णपणे चौकशी करू. यात जे अधिकारी दोषी असतील त्यांची विभागीय चौकशी करून त्यांचेवर सुध्दा प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यात येईल.

श्री. संजय शिरसाट : महानगरपालिकेत सध्या अशा प्रकरणात वेगळया पध्दतीची प्रॅक्टीस चालू आहे. आज ज्या विश्वस्तांनी आपल्याला सर्व माहिती सांगितलेली आहे त्या व्यक्तीच्या जिवीतास धोका आहे. कारण त्याला माहिती आहे की, 80 लाख रूपये घेतलेली माणसे आहेत. रू.5 हजार मध्ये त्याचे हातपाय तोडतील. तेव्हा अशा बाबतीत एखादा अधिकारी डेप्युट करावयास पाहिजे होता.

मा. आयुक्त : कोर्टाच्या आदेशाची प्रत आणून संबंधीतावर कार्यवाही करू, वाटल्यास गुन्हा दाखल करू.

श्री.अ.साजेद : ज्या वेळी पीआर कार्डवर महानगरपालिकेचे नांव रद्द करून त्या व्यक्तीचे नांव टाकले गेले त्यावेळी सिटी सर्व्हे कार्यालयाने मनपास पत्र पाठवून कळविले असेल की, सदरील जागेवरील पीआर कार्डवरून महानगरपालिकेचे नांव रद्द झालेले असल्याची नोटीस प्राप्त झाली असेल. ती प्रशासनाला दाखविण्यात आलेली नसेल. त्याची दखल का घेण्यात आली नाही. कारण तो व्यक्ती येथे भेटला व निदर्शनास आणून दिली. परंतु मा.आयुक्त यांच्या निदर्शनास ही बाब का आणून दिली नाही. ती नोटीस कुठे आहे. मालमता अधिकारी यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री.संजय जोशी : आजच्या घडीला त्या ठिकाणी एक झोपडी असतांना ताबा घेतला. त्या ठिकाणी त्या व्यक्तीच्या नांवे पाणीपट्टीचे बील येते, त्या ठिकाणी मनपाचे नळ कनेक्शन असल्याने तो सुध्दा स्वत: भरतो आहे. या बाबीची आपल्याकडेनोंद आहे. जर ह्या नोंदी असूनही ताब्यात घेतेवेळी ताबा पावती असते. त्यानुसार ंचनामा करावा लागेल आणि तेथील बांधकाम उध्वस्त करून ती जागा मनपाने ताब्यात घेतलेली आहे असा उल्लेख असावा. पैसे दिल्यापासून जमीन ताब्यात नाही. कोट्यावधी देतो. याकरीता कालमर्यादा ठरविण्यात यावी. त्यामुळे याबाबत मा.आयुक्त यांनी

एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून चौकशी करावी व 15 दिवसात लेखी अहवाल मागवून सभागृहास सादर करावा. दोषी कोण आहे हे उघडकीस येईल.

श्री.संजय शिरसाट : एका जमीनीच्या प्रकरणात सन 2002 मध्ये शंकरलाल पहाडिया यांच्या जमीनीबाबत खाजगी वाटाघाटीद्वारे समायोजनासाठी रू.2.22 लाख रजिष्ट्रीसाठी लेखा विभागातून अग्रीम घेतले आणि शंकरलाल पहाडीया यांनी रू.1.58 लाख स्वतःचे खर्च केलेले असतांनाही संबंधीत अधिकाऱ्यांनी लेखा विभागातून पैसे घेऊन समायोजन केले. तेहा अशा प्रकरणात संबंधीताने गैरव्यवहार केलेला आहे असे समजून संबंधीतावर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. लेखा परिक्षण अहवालात हे आलेले आहे. 1999 साली झाले. या संदर्भात चौकशीसाठी श्री.डी.पी.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) यांची नेमणूक करून अहवाल 15 दिवसात मागवावा.

मा. आयुक्त : 1. आताचा जो मुद्दा आहे, समायोजन प्रक्रियेबाबत आपण सुचना केल्याप्रमाणे श्री.डी.पी.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) यांनी पूर्णपणे चौकशी करावी.

2. यापुर्वीच्या चर्चेप्रमाणे श्री.गुणवानी व श्री.साळुंखे यांनी जमीन भूसंपादनाच्या प्रक्रियेत मनपाची फसवणूक करून मनपाकडून रू.1.25 कोटी घेतलेली आहे व जमीनीची मालकी स्वतःच्या नांवावर केलेली आहे. त्या संदर्भात श्री. एस. डी. पानझडे, कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांनी 15 दिवसात अहवाल द्यावा.

मा. सभापती : 1. समायोजन प्रक्रियेत श्री.डी.पी.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते.

2. स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांनी सुचना केल्याप्रमाणे जागेच्या संदर्भात श्री.गुणवानी व श्री.साळुंखे यांनी पीआर कार्डवरील मनपाचे नांव बदलले व मनपाची फसवणूक करून रू.1.25 कोटी घेतले त्याबाबतची चौकशी श्री.एस.डी.पानझडे, कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी करून 15 दिवसात अहवाल सादर करावा व संबंधीतांवर 24 तासात पोलीसात गुन्हा दाखल करावा. असे निर्देश देण्यात येतात.

**विषय क्र. 94 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीतील मलनिःसारण प्रक्रीया (ECO-FRIENDLY) करणे या कामाच्या प्रात्यक्षिकासाठी प्रथम प्रायोगीक तत्वावर सदर (ECO-FRIENDLY) ग्रीन ब्रीज टेक्नॉलॉजी द्वारे शहरातील एका ठिकाणच्या नाल्यातील सांडपाण्यावर ट्रिटमेंट करणे करीता रक्कम रू.10.00 लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रका बाबत मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवण्यासाठी शिफारस केली आहे.

सदर कामाचा खर्च अर्थसंकल्प पुस्तिका सन 2007-08 च्या पान क्र.डब्ल्यु-35 वरील अनुक्रमांक 1 अन्वये उपलब्ध तरतुद रू.10 लक्ष मधून भागविण्याचे प्रस्तावित आहे. तरी र.रू.10,00,000/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.हिंमतराव दाभाडे : सदरील प्रस्तावातील नाला कोणता आहे, त्याचा उल्लेख यामध्ये नाही.

कार्य.अभि.(वि.ड्रे.) : सिध्दार्थ गार्डनच्या मागील बाजुस असलेला नाला आहे. मुख्य जलनिःसारण वाहिनी बऱ्याच ठिकाणी आऊट ऑफ ऑर्डर आहे. नालीमधून पाणी वाहते. डायरेक्ट सोडलेले आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाची नोटीस आलेली आहे.

एमआयडीसी पंपींग त्या संदर्भातही पत्र आलेले आहे. उपाययोजना करण्यासाठी प्रस्ताव आहे. पाणी स्वच्छ करून सोडणार. त्यावर प्रायोगिक तत्वावर ट्रिटमेंट करणेचा प्रस्ताव आहे.

डॉ.आशा बिनवडे : झाल्टा ट्रिटमेंट प्लॅन्ट बाबत काय स्थिती आहे?

अति.शहर अभियंता : येथील काम 90% पूर्ण झालेले आहे. जोपर्यंत मेन सिव्हर लाईन येत नाही तोपर्यंत काम चालू होणार नाही.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील मलनिःसारण प्रक्रीया (ECO-FRIENDLY) करणे या कामाच्या प्रात्यक्षिकासाठी प्रथम प्रायोगीक तत्वावर सदर (ECO-FRIENDLY) ग्रीन ब्रीज टेक्नॉलॉजी द्वारे शहरातील एका ठिकाणच्या नाल्यातील सांडपाण्यावर ट्रिटमेंट करणे करीता तयार करण्यात आलेल्या र.रू.10,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 95 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीता आहे की, प्रभाग क्र.19 येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते बळीराम पाटील हायस्कुल पर्यंतच्या रस्त्यावर फुटपाथ बांधणे या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.19,98,700/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात सर्वसाधारण सभेने ठराव क्र.935 दि.18.7.2007 च्या सभेत प्रभाग क्र.71 न्यायनगर अंतर्गत स्मशानभुमी विकसीत करणेसाठी तरतूद केलेली रक्कम रू.20.00 लक्ष मधील रक्कम रू.5.00 लक्ष व प्रभाग क्र.62 अंतर्गत पोलीस कॉलनी येथे पाण्याची पाईपलाईन टाकणे या कामासाठीचे रक्कम रू.5.00 लक्ष असे एकूण 10.00 लक्ष व मुळ कामासाठी तरतूद असलेली रक्कम रू.10.00 लक्ष अशा प्रकारे रक्कम रू.20.00 लक्ष शहर सौंदर्यीकरण करणे या लेखाशिर्षांतर्गत पान क्र.डब्ल्यु-222 अ.क्र.4 वरील रक्कम रू.20.00 लक्ष मधून प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी 1270 मी. व रूंदी साधारणपणे 4 मी. आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांनी सदर अंदाजपत्रकाचा प्रस्ताव स्थायी समिती सभेत मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी सदर कामासाठी अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.19 येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते बळीराम पाटील हायस्कुल पर्यंतच्या रस्त्यावर फुटपाथ बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू. 19,98,700/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 96 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम या योजने अंतर्गत शासनाकडून महानगरपालिकेस रू.1,71,69,600/- अनुदान प्राप्त झालेले आहे. सदरील योजने अंतर्गत करण्यात येणारी कामे साधारणपणे 181 दिवसापर्यंत होणे शक्य नसल्यामुळे सदरील रक्कम मुदत ठेवीमध्ये 181 दिवसाच्या कालावधी करीता ठेवल्यास महानगरपालिकेस ठेवीवर व्याज प्राप्त होवू शकते. त्यानुसार विविध बँकाकडून 181 दिवसांकरीता ठेवावयाच्या मुदत ठेवी संदर्भाने व्याजाचे दर मागविण्यात आले होते ते खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | विजया बँक | 8.50% |
| 2. | यु.टी.आय.बँक | 7.30% |
| 3. | देना बँक | 7.00% |
| 4. | आयडीबीआय बँक | 9.00% |
| 5. | स्टेट बँक ऑफ इंडिया | 7.25% |

उपरोक्त दरापैकी आयडीबीआय, महानगरपालिका शाखा, औरंगाबाद या बँकेचे दर रू.9.00% असून सर्वात जास्त व्याज दर असल्यामुळे आणि महानगरपालिकेस जास्तीचे व्याज मिळणार असल्याने रू.1,71,69,000/- रक्कम 181 दिवसांसाठी आयडीबीआय बँक, महानगरपालिका शाखेत दि.6-7-2007 रोजी ठेव स्वरूपात ठेवण्यात आलेली आहे. ठेवण्यात आलेल्या ठेवीस कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम या योजने अंतर्गत शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त अनुदानातील रक्कम रू.1,71,69,000/- रक्कम आयडीबीआय, महानगरपालिका शाखा, औरंगाबाद या बँकेचे व्याज दर जास्त असल्यामुळे 181 दिवसांसाठी आयडीबीआय बँक, मनपा शाखेत दिनांक 6/7/2007 रोजी ठेव स्वरूपात ठेवण्यात आलेल्या ठेवीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 97 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.92 नागसेननगर, मिलींदनगर(स्लम) अंतर्गत कॉंक्रीट रस्ते बांधणेच्या कामासाठी सा.बां. विभागाचे दरसूची सन 2005-06 च्या दरानुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये 9,49,454/- च्या कामासाठी सर्वसाधारण सभा विषय क्र.319, दिनांक 11-8-2006 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सदर कामाचा खर्च सन 2006-2007 च्या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानातून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण एक निविदापत्रक दर भरून प्राप्त झालेले आहे. प्राप्त निविदापत्रक उघडण्यात आले असता त्यात खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

1. मे. संधु कन्स्ट्रक्शन 9.90% जास्त दराने

प्राप्त निविदा 9.90% जास्त दराची आहे. सा.बां.विभागाचे दरसूची सन 2006-2007 चे प्रचलित दराने तुलना केली असता 28.75% जास्त दर येत आहे. ज्यामुळे सदर कामावर अंदाजपत्रक रक्कम रूपये 9,49,454/- पेक्षा जास्त म्हणजेच रूपये 12,22,509/- खर्च होणार आहे. सदरील खर्चास मा.आयुक्तांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

तरी मे.संधु कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 9.90% जास्त दराने कयन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.92 नागसेननगर, मिलींदनगर(स्लम) अंतर्गत कॉंक्रीट रस्ते बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेली मे. संधु कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 9.90% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 98 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत शिवदत्त हौसिंग सोसायटी मधीलरस्त्यांवर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.11,94,500/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्यांची लांबी 598 मी. व रूंदी सरासरी 3.50 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.11,94,500/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26 गणेशनगर अंतर्गत शिवदत्त हौसिंग सोसायटी मधीलरस्त्यांवर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,94,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 99 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग प्रस्ताव सादर करीत आहेत की, सर्वसाधारण सभा ठराव क्र.744 दि.20.2.2007 अन्वये एन-5 पाणपोई ते जळगांव टी पॉइंट पर्यंत रोडमध्ये बाधीत होत असलेल्या विविध व्यासांच्या जलवाहिनी शिफ्ट करणेसाठी एकुण रू.97.00 लक्षचे अंदाजपत्रकास मान्यता झालेली आहे. त्यामधील एन-5 पाणपोई ते म्हाडा कॉलनी, देवगिरी बँक पर्यंत लाईन बदलून नव्याने 100, 150, 200, 300, 400 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रू.19,03,541/- चे तयार करून निविदा मागविण्यात आल्या असता विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकुण 3 निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकूण 3 निविदा प्राप्त झाल्या. त्याचे दराबाबत तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.व्ही.आर.महाजन | 13.7869% जास्त दराने |
| 2. | श्री.सुरेश बी. साधवानी | 32% जास्त दराने |
| 3. | एल. के. कन्स्ट्रक्शन | नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपलेली असल्याने निविदा उघडली नाही. |

वरील प्रमाणे प्राप्त निविदांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.व्ही.आर.महाजन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.7869% जास्त दराने आहे. त्यास मा.आयुक्त यांची शिफारस झालेली आहे. तरी श्री.व्ही.आर.महाजन यांची अं.प.दरापेक्षा 13.7869% जास्त दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-5 पाणपोई ते म्हाडा कॉलनी, देवगिरी बँक पर्यंत लाईन बदलून नव्याने 100, 150, 200, 300, 400 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.7869% जास्त दराची श्री.व्ही.आर. महाजन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 100 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.विजय खंडूजी वाघमारे, कनिष्ठ लिपीक तथा तत्कालीन रोखपाल, वॉर्ड-फ कार्यालय येथे रोखपाल म्हणून कार्यरत असतांना वॉर्ड-फ कार्यालया अंतर्गत मालमत्ता व पाणीपट्टी कर वसुलीची जमा झालेल्या एकूण रकमेपैकी रक्कम रू.1,67,116/- एवढी रक्कम मुख्य कार्यालयात कमी जमा केली असल्याने कार्यालयीन आदेशे क्र.मनपा/आस्था-1/2006/731, दि.20-5-2006 अन्वये निलंबीत करण्यात आले. तसेच लेखा परीक्षणाअंती रू.6,27,061/- चा अपहार केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द जवाहरनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.1-55/06 दि.1/7/2007 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच संबंधीताविरूध्द दिनांक 3-6-2006 रोजी खाते चौकशी प्रस्तावित करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी दि.23/3/2007 रोजी चौकशी अहवाल सादर केला. चौकशी अहवालात संबंधीताविरूध्द लावण्यात आलेले आरोप पूर्णतः सिध्द होत असून ते चौकशीत संपूर्ण दोषी आढळून आले आहेत.

त्यामुळे श्री.विजय खंडूजी वाघमारे, यांना दिनांक 9/5/2007 रोजी महानगरपालिका सेवेतून बडतर्फ का करण्यात येवू नये, अशी नोटीस देण्यात आली. या नोटीसीच्या अनुषंगाने त्यांनी सादर केलेला खुलासा हा असमाधानकारक असल्याने श्री.विजय खंडूजी वाघमारे, कनिष्ठ लिपीक तथा तत्कालीन रोखपाल ह्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 3 तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 (2) (ग) अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशीद खान : प्रस्ताव वाचून दाखववावा.

(सहा.आयुक्त-1 यांनी प्रस्ताव वाचून दाखवला.)

श्री.अ.रशीद खान : सदरील प्रस्तावात श्री.विजय खंडूजी वाघमारे, कनिष्ठ लिपीक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 3 तसेच मुंबई प्रां. मनपा अधिनियम 1949 चे कलम 56(2)ग अन्वये मनपा सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. परंतु याबाबतचा असा खुलासा करावा की, स्थायी समितीला असा अधिकार आहे का? माझ्या मते 56(1)अ या नियमामध्ये काय आहे ते वाचून दाखववावे.

श्री. संजय जोशी : मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 चे कलम 56(2)ग नुसार बडतर्फ केल्यास उद्याला सदरील कर्मचारी कोर्टात जाणार नाही हे कशावरून. त्यापेक्षा नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी. जेणे करून पुन्हा कामावर घ्यावे लागेल.

मा. आयुक्त : मुंबई प्रां. मनपा अधिनियम 1949 चे नियम 56(1)अ मध्ये भत्ते वगळून ज्याचे मासिक वेतन (एक हजार रूपयांहून) अधिक आहे अशा कोणत्याही कर्मचाऱ्यास स्थायी समितीच्या पूर्वसंमती वाचून आयुक्तांकडून बडतर्फ केले जाणार नाही. तर 56(2)ग अन्वये पुढे नौकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे नगरपालिकेच्या सेवेतून काढून टाकावे. 56(2)ग हे 56(1)(अ) सह वाचावे अशी दुरूस्ती व्हावी.

श्री.अ.रशीद खान : तेंव्हा या दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करावा.

मा. सभापती : प्रस्ताव दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, श्री.विजय खंडूजी वाघमारे, कनिष्ठ लिपीक तथा तत्कालीन रोखपाल वॉर्ड-फ कार्यालय, मनपा औरंगाबाद ह्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 3 तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(1)(अ), 56 (2) (ग) अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 101 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.77 अंतर्गत 11 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.12,99,800/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 940 मी. व रूंदी सरासरी 6 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.12,99,800/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.77 अंतर्गत 11 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.12,99,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 102 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा गरवारे क्रिडा संकुल येथे जलतरण तलाव बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून सदरील कामास्तव स्थायी समिती सभेच्या विषय क्र.332 दि.31.3.2006 अन्वये पारीत ठरावानुसार श्री.एन.जी.कारखाने अँड असोसिएटस्(कन्सल्टींग स्ट्रक्चरल इंजिनिअर) यांची नेमणूक सदरील प्रकल्पाच्या एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.50% या दराने फिस अदा करून घेण्यास नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदरील प्रकल्प एक वैशिष्ट्यपूर्ण असून या प्रकल्पासाठी शतप्रतिशत मानकानुसार दर्जा राखुन अत्यंत अचुकतेने काम करावयाचे आहे. ज्या योगे जलतरण तलावाचे काम पूर्णतः गळतीरोधक होईल. करीता या प्रकल्पाचे वास्तुशिल्पज्ञ व वरीष्ठ लोह सल्लागार श्री.एन.जी.कारखाने (ज्यांनी या प्रकल्पाचे संपूर्ण आराखडा व अंदाजपत्रक तयार केलेले आहे.) यांची या प्रकल्पाचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट(पीएमसी) म्हणून प्रकल्प उभारणीसाठी नेमणूक करणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी उच्च दर्जा राखून काम करून घेणे, झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन नोंदी ठेवणे, झालेल्या कामांचे देयके तयार करणे, देयके तपासणे, कामाची गुणवत्ता इत्यादी बाबत दक्षता घेणे इत्यादी स्वरूपाची कामे सदर पी.एम.सी. मार्फत करून घ्यावयाची आहे.

त्यामुळे या वाढीव स्वरूपाच्या कामासाठी एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रकल्प खर्चाच्या 0.75% वाढीव फिस अदा करून म्हणजेच यापुर्वी मंजुर असलेले दर 1.50% + 0.75% = 2.25% या दराने मोबदला शुल्क अदा करून नेमणूक करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा गरवारे क्रिडा संकुल येथे जलतरण तलाव बांधणे या प्रकल्पासाठी उच्च दर्जा राखून काम करून घेणे, झालेल्या कामाचे मोजमाप घेऊन नोंदी ठेवणे, झालेल्या कामांचे देयके तयार करणे, देयके तपासणे, कामाची गुणवत्ता इत्यादी बाबत दक्षता घेणे इत्यादी स्वरूपाची कामे करून घेण्याकरीता या प्रकल्पाचे वास्तुशिल्पज्ञ व वरीष्ठ लोह सल्लागार श्री.एन.जी.कारखाने यांची एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या प्रकल्प खर्चाच्या 0.75% वाढीव फिस अदा करून म्हणजेच यापुर्वी मंजुर असलेले दर 1.50% + 0.75% = 2.25% या दराने मोबदला शुल्क अदा करून नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 103 :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.29 हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.15,00,000/- सन 2006-07 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन 2007-08 मधील लेखाशिर्ष नवीन खडी रस्ते(शहर) अंतर्गत पान क्र.184/अ.क्र.7 मधून करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी वॉर्ड क्र.29 हिनानगरऔरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामाचे रक्कम रू.15,00,000/- अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.29 हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.15,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 104 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, रोटरी क्लब औरंगाबाद(पूर्व) यांनी वरद गणेश मंदिर ते सावरकर चौक या रस्त्यावरील दुभाजकातील झाडांच्या संरक्षण ग्रीलवर जाहीरात प्रसिध्दीचे हक्क देण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. संस्थेने 4 x 2 फुटाचे 72 नग, 3 x 2 फुटाचे 72 नग जाहीरात फलकाची मागणी केलेली आहे. सदरील संस्था रोटरी क्लब औरंगाबाद(पूर्व) ही चॅरीटेबल ट्रस्ट आहे. जाहीरातीचे उपलब्ध जागांचे भाडे रक्कम भरणा करणे बरोबरच दुभाजकाचे देखभाल सुशोभन इत्यादी स्वखर्चाने संस्था करण्यास तयार आहे. तसेच सुशोभिकरणासाठी लागणारा पाणी पुरवठा व पाणी वहनासाठी लागणारे विद्युत पुरवठा संस्थेने उपलब्ध करून दिलेला आहे.

सदरील संस्थेने मागणी केल्यानुसार 4 x 2 फुटाचे 72 नग, 3 x 2 फुटाचे 72 नग जाहीरात फलकाची जाहीरात फलक प्रसिध्दीचे हक्क दिल्यास त्यापासून महानगरपालिकेच्या वार्षिक उत्पन्नात रक्कम रू.1,81,440/- व 20% ग्राऊंड रेंट रू.36,228/- असे एकूण रक्कम रू.2,17,728/- ची भर पडेल.

मा.स्थायी समितीची मान्यता मिळाल्यास संस्थेस महानगरपालिकेच्या अटी शर्ती नुसार जाहीरात प्रसिध्दीचे हक्क प्रदान करण्यात येवून एक वर्षाचे आगाऊ जाहीरात कर भरणा करून करारनामा करून घेणेत येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोटरी क्लब औरंगाबाद(पूर्व) चॅरीटेबल ट्रस्ट यांनी विनंती केल्यानुसार, वरद गणेश मंदिर ते सावरकर चौक या रस्त्यावरील दुभाजकातील झाडांच्या संरक्षण ग्रीलवर, महानगरपालिकेच्या अटी शर्ती नुसार संबंधीत संस्थेस जाहीरात प्रसिध्दीचे हक्क प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 105 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नौबत दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे, या कामाचे रक्कम रू.17,50,000/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून सदरील कामासाठी ई-निविदा विभागातर्फे निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1. गायत्री आर्कीटेक्ट 16.00% जास्त दराने

2. न्यु स्टार कन्स्ट्रक्शन 29.99% जास्त दराने

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी गायत्री आर्कीटेक्ट यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 16% जास्त असे आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेतसादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी गायत्री आर्कीटेक्ट यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 16% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नौबत दरवाजा या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा 16% जास्त दराची गायत्री आर्कीटेक्ट यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 106 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.महापौर यांचे दालनाचे नुतनीकरण करण्याचे स्थापत्य विषयक काम प्रगतीपथावर आहे. दालनातील नुतनीकरण अंतर्गत विद्युत विषयक कामे करण्यासाठी सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.1,52,401/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. दालनाचे नुतनीकरण करणेचे काम पंधरा दिवसांत पूर्ण करणेबाबतच्या सुचना मा.महापौर यांनी दिलेल्या आहेत. कामांतर्गत वास्तुविशारद यांनी दिलेल्या नकाशाप्रमाणे दालनाचे नुतनीकरण करणेसाठी स्थापत्य कामा बरोबर विद्युतीकरणाचे काम करणे गरजेचे आहे. यामध्ये दालनातील सर्व दिवे, पंखे, बेल, संगणक, दुरध्वनी इत्यादींसाठी नवीन कन्सील वायरींग व इतर संलग्न कामे तातडीने करणे गरजेचे होते, जेणे करून स्थापत्य विषयक कामे विहीत कालावधीत पुर्ण करणे शक्य होईल. करीता विहित कालावधीत दालनाच्या नुतनीकरणाचे काम पुर्ण करण्यासाठी उपलब्ध गुत्तेदार मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने विना निविदा विद्युतीकरणाचे काम करून घेण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता रक्कम रू.1,52,401/- चे अंदाजपत्रक व मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून सदर काम पुर्ण करून घेतल्याबद्दल कार्योत्तर मंजुरीसह प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.महापौर यांचे दालनाच्या नुतनीकरणाचे काम पुर्ण करण्यासाठी विद्युत विषयक काम करण्यासाठी उपलब्ध गुत्तेदार मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स, औरंगाबाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने विना निविदा विद्युतीकरणाचे र.रू.1,52,401/- इतक्या खर्चाचे काम पुर्ण करून घेतल्याबद्दल सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 107 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना फारोळा(नवीन) येथे 670 अ.श. क्षमतेचे सहा पंप उभारणीचे काम सन 1991 मध्ये झालेले आहे. पंपाच्या सततचे वापरामुळे या पंपाचे स्लुस व्हॉल्व निकामी झाल्यामुळे सन 2005-06 मध्ये बदली कराण्यात आले आहे.

शहराच्या पाणी पुरवठ्यामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने सन 2005-06 मध्ये 350 अ.श. क्षमतेचा एक व सन 2006-07 मध्ये 670 अ.श. क्षमतेचे दोन अतिरिक्त पंप बसविण्यात आले आहे. शहरास 1200 मी.मी. जलवाहिनीद्वारे जास्तीत जास्त पाणी पुरवठा करण्यासाठी येथील पाच पंप चालविण्यात येतात. येथील काही पंपाचे व्हॉल्व समाधानकारक काम करत नसल्यामुळे पाण्याची गळती होत आहे. करीता नवीन व्हॉल्व खरेदी करणे आवश्यक आहे. एक स्लुस व्हॉल्व व सहा एनआरव्ही व्हॉल्व

पुरवठा करणे, उभारणी करणे व चाचणी देणे या साठी आयव्हीसी कंपनीच्या दिनांक 3/8/2005 च्या दरपत्रकानुसार अंदाजपत्रक रू.8,22,830/- रक्कमेचे आहे.

निविदा सुचना क्रमांक 15 दि.8/6/2007 प्रमाणे या कामासाठी तिसऱ्यांदा निविदा मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या व स्विकृतीच्या शेवटच्या दिनांक 12/6/2007 पर्यंत दोन निविदा विक्री झाल्या व प्राप्त झाल्या. उघडण्यात आलेल्या निविदेतील दर खालील प्रमाणे आहे.

1. मे. अमीत इंजिनिअर्स औरंगाबाद अं.प.दरापेक्षा 41% जास्त दराने

2. मे.तिरूपती इलेक्ट्रीकल सेल्स अँड सर्व्हीसेस, औ,बाद अं.प.दरापेक्षा 49% जास्त दराने

यावरून तुलनात्मकदृष्ट्या मे.अमीत इंजिनिअर्स औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असून अं.प.दरापेक्षा 41% जास्त दराने आहेत. दिनांक 9/3/2007 च्या दरपत्रकानुसार कंपनीच्या दरामध्ये 76.13% वाढ झाल्याचे दिसून येते. यावरून व्हॉल्व उत्पादक कंपनीचे दरामध्ये वाढ झालेली असल्यामुळे निविदेतील दर जास्त झाल्याचे दिसते.

नविन फारोळा येथील पंपासाठी वरील प्रमाणे व्हॉल्सचा पुरवठा करणे, उभारणी करणे व चाचणी देणे यासाठी सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणे बाबत मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे. करीता मे.अमीत इंजिनिअर्स औरंगाबाद यांची अं.प.दरापेक्षा 41% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत पाण्याची गळती होत असल्याने नविन फारोळा येथील पंपासाठी आवश्यक असणारे एक स्लुस व्हॉल्व व सहा एनआरव्ही व्हॉल्व पुरवठा करणे, उभारणी करणे व चाचणी देणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा 41% जास्त दराची मे.अमीत इंजिनिअर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 108 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.37 मधील कामगार कॉलनी-दलालवाडी या भागातील विविध ठिकाणच्या जलनिःसारण वाहिनीची अपरूटींग करण्यासह आवश्यक तेथे ड्रेनेज लाईन बदलणे इ. कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा. च्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे रक्कम रू.11,04,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील कामाकरीता सन 2007-08 च्या अर्थसंकल्पामध्ये जलनिःसारण देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षा खाली तरतुद उपलब्ध आहे.

सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता दि.9-8-2007 नुसार प्राप्त आहे. करीता सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.37 मधील कामगार कॉलनी-दलालवाडी या भागातील विविध ठिकाणच्या जलनिःसारण वाहिनीची अपरूटींग करण्यासह आवश्यक तेथे ड्रेनेज लाईन बदलणे इ. कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,04,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 109 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोतीवालानगर ते सुराणानगर, कैलासनगर स्मशानभुमी ते दादा कॉलनी दत्तनगर, भवानीनगर ते तक्षशिलानगर, जाफरगेट मोठा पुल पर्यंतचा नाला सफाई (डिसिल्टींग) करणे भाग-अ या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार कराण्यात आलेल्या रक्कम रू.29,26,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारणसभा ठराव क्र.20/6/2007 अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा

विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा दर भरून प्राप्त झाली असल्याचा अहवाल इ-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे.

1. एस. बी. कन्स्ट्रक्शन 17.17% कमी दराने

अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.17% कमी दराची मे. एस.बी. कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. मा.आयुक्त यांनी त्यास मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी शिफारस केली आहे.

तरी मे. एस. बी. कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 17.17% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीवालानगर ते सुराणानगर, कैलासनगर स्मशान भुमी ते दादा कॉलनी दत्तनगर, भवानीनगर ते तक्षशिलानगर, जाफरगेट मोठा पुलपर्यंतचा नाला सफाई (डिसिल्टींग) करणे भाग-अ, या कामासाठी प्राप्त झालेली एस.बी.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.17% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 110 :**

मा.आयुक्त यांची मान्यता दि. 4-8-2007 नुसार उप आयुक्त(म) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दारिद्र्य निर्मुलन कक्षातर्फे केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मानधनावर नियुक्त करावयाच्या समूह संघटक या पदासाठी पात्र उमेदवारांची दिनांक 19-7-2005 रोजी झालेल्या निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे विविध स्वयंसेवी संस्थामार्फत रू.3000/- द.म. मानधन तत्वावर अकरा महिन्याच्या कालावधीकरीता यिुक्ती करण्यात आली होती. याबाबतचा महानगरपालिकेने त्यांच्यासोबत करारानामा केला होता. वरील समूह संघटकांची मुदत दि.31 मे 2007 रोजी संपल्यामुळे व स्थायी समिती सभा दि.24.11.2006 च्या निर्णयानुसार त्यांना सेवेतून कमी करण्यात आले. सदर पदे स्वयंसेवी संस्थांकडून भरण्यात येऊ नयेत अशी सूचना शासनाकडून पत्र जा.क्र.सुजयो/2007/प्रशासकीय यंत्रणा/प्र.क्र.-261/का-82, दि.14 जुन 2007 नुसार करण्यात आली. प्रस्तावित केलेल्या खालील समूह संघटकांची दारिद्र्य निर्मुलन कक्षात गरज आहे. असा अहवाल प्रकल्प संचालक यांनी दिलेला आहे.

1. शारदा खरात
2. ललिता दाभाडे
3. सुनिता कुलकर्णी
4. मंगला संताराम जाधव
5. सत्वगुणा जोगदंड
6. सविता आगळे
7. सरला मेश्राम

तरी वरील मानद समूह संघटकांना पुढील 11 महिन्यांसाठी करार तत्वावर मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दारिद्र्य निर्मुलन कक्षातर्फे केंद्र शासन पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मानधनावर नियुक्त करावयाच्या समूह संघटक या पदासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.1 ते 7 चे मानद समूह संघटकांना पुढील 11 महिन्यांसाठी करार तत्वावर मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 111 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबादयांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.54 संजयनगर, बायजीपुरा मुख्य रस्त्याचे कॉंक्रीट पेवमेंट बांधणेच्या कामाचे सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च दरसूची नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.12,54,200/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-2008 या आर्थिक वर्षात स्लम विभागात नविन कॉंक्रीट रस्ते या लेखा शिर्षातुन करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे व स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रूपये 12,54,200/-च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.54 संजयनगर, बायजीपुरा मुख्य रस्त्याचे कॉंक्रीट पेवमेंट बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,54,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 112 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.38 अंतर्गत गांधीनगर, बहादुरपुरा, बापुनगर भागात नवीन 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के.-9 जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2006-07 च्या दरसुची नुसार रक्कम रू.10,99,788/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा ह्या लेखा शिर्षामधुन करण्यात येणार आहे. करीता कामाचे अंदाजपत्रक रू.10,99,788/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.38 अंतर्गत गांधीनगर, बहादुरपुरा, बापुनगर भागात नवीन 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के.-9 जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.10,99,788/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 113 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1, 2, 3 येथे विविध विभागात देखभाल दुरूस्ती,पार्टीशन, पाईप, चेंबर, नळ दुरूस्ती, रंगकाम, सिलींग, दरवाजा बदलणे, स्लायडींग विंडो, ग्रील, ॲल्युमिनियम दरवाजे व इतर विविध प्रकारचे कामे करणेस्तव मा.पदाधिकारी व अधिकारी यांच्याकडून सूचना करण्यात येतात. प्रशासकीय इमारत येथे विविध आवश्यक कामे वर्षभराच्या कालावधीमध्ये करण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाबी व परिमाण गृहीत धरून सा.बां. विभागाचे जिल्हा दरसुची सन 2007-08 नुसार रक्कम रू.13.50 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन प्रस्तावित कामे हे एक वर्षाच्या कालावधीत करण्यात येणार आहेत. त्यानुसार मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत प्रशासकीय इमारती पान क्र.डब्ल्यु-30 अ.क्र.5 नुसार करण्यात येईल. उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रू.13.50 लक्ष चा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय इमारत येथे विविध आवश्यक कामे वर्षभराच्या कालावधीमध्ये करण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाबी व परिमाण गृहीत धरून तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13.50 लक्ष च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 114 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.93 मधील वेदांतनगर पाण्याच्या टाकीजवळील खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधण्यासाठी सा.बां. विभागाचे जिल्हा दरसुची सन 2007-08 नुसार रक्कम रूपये 14,99,984/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.डब्ल्यु 167 व डब्ल्यु 228 च्या तरतुदी अन्वये वळती ठराव क्र.905/2 दि.18.7.2007 नुसार करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.14,99,984/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.93 मधील वेदांतनगर पाण्याच्या टाकीजवळील खुल्या जागेत बहुउद्देशीय हॉल बांधण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,99,984/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 115 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.38 अंतर्गत बंजारा कॉलनी, बापुनगर भागातील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.13,50,400/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते(शहर) या लेखा शिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 750 मी. व रूंदी सरासरी 2.70 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.13,50,400/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.38 अंतर्गत बंजारा कॉलनी, बापुनगर भागातील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,50,400/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 116 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.4 एन-13 सी व डी सेक्टर येथील मंजुर जागेवर आरोग्य केंद्र बांधणे करीता वास्तुविशारद एस.बी.एस.असोसिएटस् यांचेकडून दवाखाना इमारतीचे सविस्तर प्लॅनिंग, नकाशे व अंदाजपत्रक इत्यादी कामे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% दराने मोबदला अदा करून घेणेस्तव मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव वास्तु विशारद एस.बी.एस.असोसिएटस् यांची नेमणूक अं.प.रक्कमेच्या 1.5% दराने मोबदला अदा करून काम करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.4 एन-13 सी व डी सेक्टर येथील मंजुर जागेवर आरोग्य केंद्र बांधणे करीता वास्तुविशारद एस.बी.एस.असोसिएटस् यांचेकडून दवाखाना इमारतीचे सविस्तर प्लॅनिंग, नकाशे व अंदाजपत्रक इत्यादी कामे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% दराने मोबदला अदा करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.117 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.23 मसनतपुर चिकलठाणा अंतर्गत मसनतपुर येथील एमआयडीसी ची जागा विकत घेऊन विकसीत करणे करीता वास्तुविशारद मे.आर्क असोसिएटस् यांचे कडून वरील जागा विकसीत करणे करीता सविस्तर प्लॅनिंग, नकाशे व अंदाजपत्रक इत्यादी कामे अं.प.रक्कमेच्या 1.00% दराने मोबदला अदा करून घेणेस्तव मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव वास्तु विशारद मे. आर्क असोसिएटस् यांची नेमणूक अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.00% दराने मोबदला अदा करून काम करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.23 मसनतपुर चिकलठाणा अंतर्गत मसनतपुर येथील एमआयडीसी ची जागा विकत घेऊन विकसीत करणे करीता वास्तुविशारद मे.आर्क असोसिएटस् यांचे कडून वरील जागा विकसीत करणे करीता सविस्तर प्लॅनिंग, नकाशे व अंदाजपत्रक इत्यादी कामे अं.प.रक्कमेच्या 1.00% दराने मोबदला अदा करून करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.118 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारा लगत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेसाठी सदरील कामाचे सविस्तर नकाशे, उदा.प्लॅन, इलेव्हेशन सेक्शन, आर.सी.सी.डिझाईन इत्यादी तयार करणे, तसेच महाराष्ट्र शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची चबुतऱ्यास/आराखड्यास मान्यता घेणेसाठी नकाशे सादर करणे तसेच प्रस्तुत कामावर देखरेख करण्यासाठी वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांची नियुक्ती करून त्यांचे मार्फत उपरोक्त कामे करणेसाठी व सदरील पुतळ्यासाठी शिल्पकारांमार्फत पुतळा उभारणेसाठी दरपत्रके मागविण्यासाठी 1.50% कन्सल्टन्सी चार्जेसवर नियुक्ती करणेसाठी मा.आयुक्त यांनी शिफारस केली असून प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारा लगत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेसाठी सदरील कामाचे सविस्तर नकाशे, उदा.प्लॅन, इलेव्हेशन सेक्शन, आर.सी.सी.डिझाईन इत्यादी तयार करणे, तसेच महाराष्ट्र शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची चबुतऱ्यास/आराखड्यास मान्यता घेणेसाठी नकाशे सादर करणे तसेच प्रस्तुत कामावर देखरेख करण्यासाठी वास्तुविशारद श्री.गणेश म्हारोळकर यांची नियुक्ती करून त्यांचे मार्फत उपरोक्त कामे करणेसाठी 1.50% कन्सल्टन्सी चार्जेसवर नियुक्ती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 119 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. 42 करीम कॉलनी भागातील नागरीकांना जाण्या येण्यासाठी रस्ता नाही. ते लोक रिटेनींग वॉलच्या टॉपवरून ये-जा करतात. यामध्ये कधीही अपघात होऊन पादचारी नाल्यात पडू शकतात. त्यामुळे करीम कॉलनी ते म्हाडा कॉलनी पर्यंत मनपाच्या नाल्यातील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व त्यावर आरसीसी स्लॅब टाकणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2004-05 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या र.रू.10,51,118/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.16.1.2007 ठराव क्र.205 अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यानुसार या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण चार निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

1. मे. शहा कन्स्ट्रक्शन 9.99% जास्त दराने
2. श्री.मुबारक एम. पठाण 10.89% जास्त दराने
3. शेख सलीम मोहीनोद्यीन 11.98% जास्त दराने
4. एस. एम. इब्राहीम 13.99% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आणि अं.प.दरापेक्षा 9.99% जास्त दराची निविदा मे.शहा कन्स्ट्रक्शन यांची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी वाटाघटीअंती त्यास मंजुरीस्तव स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी शिफारस केली आहे.

तरी मे.शहा कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 9.99% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रसताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.42 मधील करीम कॉलनी ते म्हाडा कॉलनी पर्यंत मनपाच्या नाल्यातील संरक्षित भिंतीची उंची वाढविणे व त्यावर आरसीसी स्लॅब टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 9.99% जास्त दराची मे. शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 120 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या(जायकवाडी उद्‌भव) ढोरकीन पंपगृह येथे 350 अ.श. चे वॉटर लुब्रीकेड WPIL कंपनीचे एकुण सहा पंप दि.14.5.2005 रोजी बसविण्यात आलेले आहेत. सदरील पंप सतत चालू असल्याने पंपाच्या पार्टस्ची झीज होते. खराब झालेले पंपाचे पार्टस् काढून त्या पंपासाठी नवीन पार्टस् बसविणे आवश्यक असते.

आतापर्यंत या पंपासाठी पंप बसविल्यापासून सुट्या भागाची खरेदी करण्यात आलेली नाही. सदरील पंप विशिष्ट बनावटीचे असल्यामुळे त्यासाठी लागणारे सुटे भाग वेळोवेळी मार्केट मध्ये उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे एकत्रीत खरेदी करून खात्याच्या भांडारमध्ये ठेवणे गरजेचे आहे.

आवश्यक सुटे भाग खरेदी करण्यासाठी WPIL कंपनीच्या दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू.15,04,937/- एवढी आहे. सदरील अंदाजपत्रक स्थायी समिती समोर सादर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. या कामासाठी होणारा खर्च पंप दुरूस्ती व मशीनरी खरेदी या लेखाशिर्षा खाली करण्यात येईल.

तरी ढोरकीन पंपगृह येथील पंपासाठी स्पेअर पार्टस् खरेदीसाठी रक्कम रू.15,04,937/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या(जायकवाडी उद्‌भव) ढोरकीन पंपगृह येथील पंपासाठी लागणारे स्पेअर पार्टस् खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.15,04,937/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 121 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग **अ** ते **फ** मधील विविध वॉर्डातील ड्रेनेज चोकअप व गाळ/मलबा साठल्याच्या विविध तक्रारी प्राप्त होत असतात. प्राप्त तक्रारीनुसार वार्डातील कर्मचारी चोकअप काढणेसाठी प्रयत्न करतात. परंतु वेळेवर व समाधानकारक काम होत नाही. त्यानुषंगाने ड्रेनेज चोकअप, गाळ, मलबा काढणे इत्यादी प्राप्त तक्रारींचे वेळेवर व समाधानकारक निरसन होण्यासाठी प्रत्येक वॉर्ड कार्यालयासाठी खालील प्रमाणे मशीनरी खरेदी करणे आवश्यक आहे.

- नाली/ड्रेनेज स्वच्छ करण्यासाठी पॉवर बकेट मशिन (पुर्ण सेट)
- चोकअप काढणेसाठी पॉवर रॉडींग मशिन (पुर्ण सेट)

उक्त प्रमाणे मशिनरी खरेदी करणेसाठी प्राप्त दरपत्रकाच्या माधारभुत किंमतीनुसार प्रत्येक वॉर्डासाठी एक प्रमाणे सहा पॉवर बकेट मशिन व सहा पॉवर रॉडींग मशिन खरेदी करणेसाठी रक्कम रू.40,80,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदर मशिनरी खरेदीचा खर्च अर्थसंकल्प सन 2006-07 मधील लेखाशिर्ष मलनि:सारण वाहिनीचा स्तर उंचाविणे व यंत्र सामुग्री खरेदी मधुन भागविण्याचे प्रस्तावीत असून सदर प्रस्तावास दिनांक 20.1.2007 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे आणि मशिन खरेदी नंतर वर्षभन Preventive Maintenance करण्यासाठी वार्षीक करारावर संपूर्ण शहरासाठी खाजगी एजन्सी नेमण्यासही सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. त्यानुसार काम करण्यात येईल.

सर्वसाधारण सभेच्या प्राप्त मंजुरीनुसार डी फॉर्म नमुन्यात जा.क्र.मनपा/ई-निविदा/106/2007 दिनांक 8.3.2007 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत एकही निविदा विक्री झाली नाही. त्यामुळे ई-निविदा विभागातर्फे निविदा क्रमांक 15-07-53-A अन्वये पुनःश्च निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम दिनांकास एक निविदा विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या दिनांकास श्री.सिध्दीविनायक इंटरप्रायजेस, सोलापुर यांची निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदेचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | यंत्र सामुग्रीचे विवरण | पुरवठा करावयाचे नग | दर प्रति नग | एकुण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| 1 | पॉवर बकेट मशिन (पुर्ण सेट) | 06 | 5,35,500/- | 32,13,000/- |
| 2 | पॉवर रॉडींग मशिन (पुर्ण सेट) | 06 | 1,78,500/- | 10,71,000/- |
| | | | **7,14,000/-** | **42,84,000/-** |

उक्त प्रमाणे श्री सिध्दीविनायक इंटरप्रायजेस, सोलापुर यांचे प्राप्त दरानुसार एक पॉवर बकेट मशिन व पॉवर रॉडींग मशिन खरेदीसाठी रक्कम रूपये 7,14,000/- प्रमाणे, सहा पॉवर बकेट मशिन व सहा पॉवर रॉडींग मशिन खरेदीसाठी एकुण रक्कम रूपये 42,84,000/- चे दर प्राप्त झालेले असून, सदर मशिनरी खरेदी बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याची शिपुारस मा. आयुक्त यांनी केली आहे.

तरी उक्त प्रमाणे श्री सिध्दीविनायक इंटरप्रायजेस, सोलापुर यांचे कडून सहा पॉवर बकेट मशिन व सहा पॉवर रॉडींग मशिन खरेदीसाठी एकुण रक्कम रूपये 42,84,000/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ड्रेनेज चोकअप, गाळ, मलबा काढणे इत्यादी प्राप्त तक्रारींचे वेळेवर व समाधानकारक निरसन होण्यासाठी प्रत्येक वॉर्ड कार्यालयासाठी एक याप्रमाणे एकूण सहा **पॉवर बकेट मशिन** व **सहा पॉवर रॉडींग मशिन** खरेदी करणेसाठी प्राप्त झालेली श्री. सिध्दीविनायक इंटरप्रायजेस, सोलापुर यांची पॉवर बकेट मशिन (पुर्ण सेट) साठी रू.5,35,500/-प्रति नग व पॉवर रॉडींग मशिन (पुर्ण सेट) साठी रू.1,78,500/- प्रति नग या दराची निविदा स्विकारणेस तसेच यासाठी लागणाऱ्या एकूण रक्कम रू.42,84,000/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

सदर मशिनरी प्रथमच खरेदी करत असल्यामुळे ते चालविण्यासाठी आवश्यक अनुभवी कर्मचारी वर्ग मनपाकडे उपलब्ध नाही. शिवाय यासाठी वेगळा कर्मचारी वर्ग नेमावयाचा झाल्यास त्यांच्या वेतन/भत्त्यामुळे मनपावर आर्थिक बोजा पडेल. म्हणून सदरचे काम खात्यामार्फत न करता संपूर्ण शहरासाठी वार्ड निहाय वार्षिक देखभाल दुरूस्तीचे कामाची स्वतंत्र निविदा काढून जलनि:सारण वाहिन्यांच्या देखभाल दुरूस्तीची कामे (चोकअप काढणे) करून घेण्यात यावीत. सदर मशीनरीची देखभालदुरूस्ती देखील वार्षिक देखभाल दुरूस्तीचे काम करणाऱ्या संबंधीत एजन्सीकडून करून घ्यावी.

वार्षिक देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी लागणारी आर्थिक तरतुद सुधारीत अर्थसंकल्पात करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 122 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **1)** अतिवृष्टीच्या काळात शहराच्या बऱ्याच निवासी भागात पाणी साचून नागरीकांच्या घरात पाणी शिरण्याच्या घटना घडून, अशा वेळेत ठिकठिकाणाहून साचलेले पाणी काढण्याची मागणी होते. तसेच ड्रेनेज चोकअप होऊन चेंबरद्वारे पाणी रस्त्यावर वाहत असल्याच्या तक्रारी

प्राप्त होत असतात. यासाठी आवश्यक साधन सामुग्रीसह मशिनरी/पंप असणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने Solid Handling Pump/Trash Pump खरेदीसाठी प्राप्त दरपत्रकाच्या आधारभुत किंमतीनुसार तीन नग Solid Handling Pump/Trash Pump खरेदीसाठी रक्कम रूपये 18,45,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

सदर पंप खरेदीचा खर्च अर्थसंकल्प सन 2007-08 मधील लेखाशिर्ष **अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी** मधुन भागविण्याचे प्रस्तावीत असून, सदर प्रस्तावास दिनांक 20.1.2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.72 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

**2)** पावसाळ्यात नैसर्गिक आपत्ती जसे पुर, चक्रीवादळे, इमारतींची पडझड, निवासी भागात पाणी शिरणे इत्यादी आपत्कालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन दलास वेळोवेळी Portable diaphragm sluge handling pump ची आवश्यकता भासते. त्यानुषंगाने सदर पंप खरेदीसाठी प्राप्त दरपत्रकाच्या आधारभुत किंमतीनुसार दोन नग Portable diaphragm sluge handling pump खरेदीसाठी रक्कम रूपये 10,88,620/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

सदर पंप खरेदीचा खर्च अर्थसंकल्प सन 2006-07 मधील लेखाशिर्ष विभागीय आपतकालीन व्यवस्थापन व साहित्य खरेदी मधुन भागविण्याचे प्रस्तावीत असून, सदर प्रस्तावास दिनांक 26.6.2007 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेने विषय क्र.45 अन्वये मान्यता दिली आहे.

उक्त दोन्ही मशिनरी/पंप खरेदी ह्या डी फॉर्म निविदा द्वारे खरेदीच्या असल्याने, उक्त प्रमाणे तीन नग Solid Handling Pump/Trash Pump व दोन नग Portable diaphragm sluge handling pump खरेदीसाठी एकत्रित डी फॉर्म नमुन्यात ई-निविदा विभागातर्फे निविदा क्रमांक 15-07-56 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता, निविदा विक्रीच्या अंतिम दिवशी तीन निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या दिनांकास तीन निविदा प्राप्त झाल्या, प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे.

| **Sr. No.** | **Bidder Name** | **Rate Quoted** | |
|---|---|---|---|
| | | Solid Handling Pump/Trash pump (For 3 Nos.) | Portable diaphragm sluge handling pump (For 2 Nos.) |
| 1. | Hi-Tech Services, Pune | **17,73,000/-** | **11,34.000/-** |
| 2. | Ti Fire & Engineering Services, Pune | **16,77,000/-** | **11,00,000/-** |
| 3. | Babolat Associates, Pune | **16,14,000/-** | **10,40,000/-** |

उक्त प्रमाणे प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हे **Babolat Associates, Pune** यांचे तीन Solid Handling Pump/Trash pump साठी रक्कम रूपये 16,14,000/- आणि दोन Portable diaphragm sluge handling pump साठी रक्कम रूपये 10,40,000/- इतके प्राप्त झाले असून, सदर पंप खरेदी बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याची शिफारस मा.आयुक्त यांनी केली आहे.

तरी उक्त प्रमाणे **Babolat Associates, Pune** यांचे प्राप्त दरानुसार तीन **Solid Handling Pump/Trash pump** रक्कम रूपये 16,14,000/- दराने आणि दोन **Portable diaphragm sluge handling pump** रक्कम रूपये 10,40,000/- दराने खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (1) ड्रेनेज विभागाकरीता आवश्यकता भासणारी मशिनरी तीन नग Solid Handling Pump/Trash Pump व (2)अग्निशमन विभागाकरीता आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यक असणारे पंप दोन नग Portable diaphragm sluge handling pump खरेदीसाठी प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक **Babolat Associates, Pune** यांचेकडून तीन **Solid Handling Pump/Trash pump** रक्कम रूपये 16,14,000/- दराने आणि दोन **Portable diaphragm sluge handling pump** रक्कम रूपये 10,40,000/- या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

स्था.स.सभा दि.4/9/2007 मधील ठराव क्रमांक 121 मध्ये नमूद केल्याप्रमाणे Solid Handling Pump/Trash Pump च्या वापराकरीता देखील वार्षिक देखभाल दुरूस्तीची स्वतंत्र निविदा काढून एजन्सीमार्फत काम करून घ्यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 123 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत 56 द.ल.लि. जलशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण (Re-gradation) करणे या कामाचे अंदाजपत्रक एमआयडीसी व सा.बां. विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीनुसार रूपये 14,99,560/- चे तयार करण्यात आले होते. औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेचे सक्षमीकरण करणे या प्रस्तावांतर्गत एकत्रित अंदाजपत्रकास विषय क्र.416/4 दिनांक 5.4.2004 अन्वये सर्वसाधारण सभेची मान्यता झालेली आहे.

मंजुरीनुसार मनपा निविदा सूचना जा.क्र.लेखा/नि/97/2006 दिनांक 10.2.2006 नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आली. विक्री झालेल्या दहा निविदांपैकी दर भरलेल्या सात निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 50% जास्त दराने |
| 2. | मे. डी. यु. जोशी | अं.प.दरापेक्षा 60% जास्त दराने |
| 3. | मे.व्ही.आर.महाजन | अं.प.दरापेक्षा 30% जास्त दराने |
| 4. | मे. एजाज अहमद जमाल अहमद | अनुभव प्रमाणपत्र नसल्याने निविदा उघडली नाही |
| 5. | मे. पी. पी. जोशी | इसारा रक्कम पावती न जोडल्यामुळे निविदा उघडली नाही. |
| 6. | मे. अमित इंजिनिअर्स | अनुभव प्रमाणपत्र नसल्याने निविदा उघडली नाही. |
| 7. | मे. आर. बी. रूडसमुद्र | अनुभव प्रमाणपत्र नसल्याने निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हे मे.व्ही.आर. महाजन यांचे अं.प.दरापेक्षा 30% जास्त असे होते. तथापी प्राप्त दर हे जास्तीचे असल्याने मा.आयुक्त यांनी फेरनिविदा काढण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार मनपा निविदा सुचना क्र.9/06 दिनांक 17.5.2006 नुसार कामाची फेरनिविदा काढण्यात आली. विक्री झालेल्या दोन निविदांपैकी दर भरलेल्या दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 38.5% जास्त दराने |
| 2. | मे. अमीत इंजिनिअर्स | अं.प.दरापेक्षा 60% जास्त दराने |

तुलनात्म्कदृष्ट्या कमी दर हे मे. एल.के. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 38.5% जास्त असे होते. गुत्तेदाराकडून बाबनिहाय दर पृथ:करण देखील मागविले होते. त्याचप्रमाणे नवीन दरसूचीनुसार (2005-06) तुलना केली असता, 38.5% जास्त दराची निविदा ही जास्तीची वाटत असल्याने मा. आयुक्त यांनी पुन्हा फेरनिविदा काढण्याबाबत आदेशीत केले होते.

आदेशानुसार ई-निविदा विभागातर्फे निविदा सुचना क्र.104/2007 दिनांक 27.2.2007 नुसार प्रसिध्द करण्यात आली. विक्री झालेल्या दोन निविदांपैकी दर भरलेल्या दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. एल.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 35% जास्त दराने |
| 2. | मे. डी. यु. जोशी | अं.प.दरापेक्षा 55% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हे मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35% जास्त असे आहेत. गुत्तेदारांकडून बाबनिहाय दरपृथ:करण देखील मागविले असता, साहित्याचे बाजारभाव व वाहतूक यामुळे जास्तीचे दर असल्याचे नमुद केले आहे. गुतेदारा समवेत वाटाघाटीअंती दर कमी करण्यास गुत्तेदाराने सहमती दिली नाही. सदरील कामाची निविदा तीन वेळेस प्रसिध्द करण्यात आली असल्याने मा.आयुक्त यांनी 35% जास्त दराची निविदा स्थायी समिती समोर ठेवण्याची शिफारस केली आहे.

करीता 56 द.ल.लि. जलशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण करणे या कामाची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35% जास्त दराने म्हणजेच 20,24,406/- इतक्या रक्कमेच्या खर्चासह मे. एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे कडून करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत 56 द.ल.लि. जलशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण (Re-gradation) करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारक मे. एल.के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 35% जास्त दराने करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रू.20,24,406/- इतक्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 124 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये महानगरपालिकेच्या एकुण 61 केंद्रीय व प्राथमिक शाळा असून सदरील शाळेमधील किरकोळ देखभाल दुरूस्ती नियमित होत नसल्याने शाळेमधील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्याकरीता शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी शाळेची नियमीत देखभाल होणे अत्यंत गरजेचे असल्याने व महानगरपालिकेकडील तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या असलेल्या कमतरतेमुळे महानगरपालिकेच्या विविध शाळेच्या देखभाल दुरूस्तीच्या विविध कामांकरीता वेळेवर लक्ष देणे शक्य होत नसल्याने आऊटसोर्सींगने महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व शाळांसाठी देखभाल दुरूस्ती करीता आवश्यक असणारे अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे तयार करणे, कामाची निविदा तयार करणे, मंजुर कामावर नियमित देखरेख ठेवून काम मानकाप्रमाणे होत असल्याची खात्री करणे, झालेल्या कामांची देयके तयार करून विभागात सादर करणे, कामाच्या पुर्णत्वाचे नकाशे तयार करणे इत्यादी कामांसाठी पीएमसी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) ची नियुक्ती करणे आवश्यक आहे. याबाबत मा.आयुक्त यांनी सदरचे आऊटसोर्सींगचे काम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% दराने करून घेण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

पीएमसी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) ची नियुक्ती केल्यास देखभाल दुरूस्तीची कामे संबंधीत एजन्सी मार्फत देखरेख ठेवुन मानकाप्रमाणे करून घेता येईल. त्यामुळे महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या अनेक अडचणींचा निपटारा होवुन पर्यायाने शाळेचा दर्जा उंचावणार आहे.

करीता महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळा इमारतींची विविध देखभाल दुरूस्ती करीता उपरोक्त दरानुसार पीएमसी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) नेमणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या शाळांची किरकोळ देखभाल दुरूस्ती नियमितपणे होण्यासाठी आऊटसोर्सींगने, सर्व शाळांसाठी देखभाल दुरूस्ती करीता आवश्यक असणारे अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे तयार करणे, कामाची निविदा तयार करणे, मंजुर कामावर नियमित देखरेख ठेवून काम मानकाप्रमाणे होत असल्याची खात्री करणे, झालेल्या कामांची देयके तयार करून विभागात सादर करणे, कामाच्या पुर्णत्वाचे नकाशे तयार करणे इत्यादी कामांसाठी पीएमसी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) ची नियुक्ती करणेस व सदरचे आऊटसोर्सींगचे काम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 125 :**

कार्यकारी अभियंता(जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील पथदिवे कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करणेसाठी सन 2006-07 या वित्तीय वर्षात विद्युत देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षातुन प्रभाग अ, ब, क, ड, इ, फ व सिडकोसाठी एकुण चौदा कामांची रूपये 151.00 लक्षची निविदा काढण्यात आल्या होत्या आणि एकुण चौदा कंत्राटदार नेमून देखभाल दुरूस्तीच्या कामाचे आदेश प्रशासकीय मान्यतेअंती निर्गमित केले. सदर निविदेच्या वेळेस

पथदिव्यांची तंतोतंत संख्या उपलब्ध नव्हती, त्यामुळे ढोबळमानाने पथदिव्यांची संख्या गृहीत धरून कार्यादेश देण्यात आले होते. तद्नंतर सविस्तर सर्वेक्षण अंती असे निदर्शनास आले की, पोल व फिटींगच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे पुर्वीचे आणि वाढीव असे एकूण पोल/पथदिव्यांची संख्या प्रभाग निहाय खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वॉर्डाचे नांव | पोलची संख्या |
|---|---|---|
| 1. | प्रभाग - **अ** | 2681 |
| 2. | प्रभाग - **अ** | 2753 |
| 3. | प्रभाग - **ब** | 1569 |
| 4. | प्रभाग - **क** | 1629 |
| 5. | प्रभाग - **क** | 2047 |
| 6. | प्रभाग - **ड** | 2322 |
| 7. | प्रभाग - **ड** | 2335 |
| 8. | प्रभाग - **इ** | 1766 |
| 9. | प्रभाग - **इ** | 1865 |
| 10. | प्रभाग - **फ** | 2221 |
| 11. | प्रभाग - **फ** | 1972 |
| 12. | सिडको एन-5 ते एन-8 | 2500 |
| 13. | सिडको एन-9 ते एन-13 | 2237 |
| 14. | एन-3, एन-4, शिवाजीनगर | 2729 |
| | **एकुण पोल....** | **30,626** |

वरील प्रमाणे वाढीव पोलच्या संख्येमुळे मुळ निविदेच्या रक्कमेत वाढ असून, सदर वाढीव रक्कम रूपये 118.83 लक्ष इतकी आहे.

उपरोक्त पोलची देखभाल दुरूस्ती सद्यःस्थितीत करण्यात येत असून, त्याचा कालावधी ऑगष्ट महिन्या अखेर पर्यंत आहे. तद्नंतर नविन निविदा प्रक्रिया करून काम करण्याचे प्रस्तावित असून, दिनांक 18.7.2007 च्या सर्वसाधारण सभेत कामांच्या अंदाजपत्रकांना मान्यता प्राप्त करणेसाठी प्रस्ताव ठेवण्यात आला होता. प्रत्येक वॉर्डासाठी एक अशा प्रकारे 98 वॉर्डांसाठी 98 कंत्राटदार नेमून काम करणेचा ठराव सर्वसाधारण सभेने पारीत केलेला आहे. तथापी प्रत्यक्ष काम करतांना मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होवु शकतील याबाबत मा.महापौर यांचे निदर्शनास आणुन दिले आहे. त्यानुसार सर्वसाधारण सभा दुरूस्ती ठराव पारीत करणार आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता आहे.

तसेच आगामी सणासुदीचे दिवस लक्षात घेता निविदा प्रक्रियेस लागणारा वेळ विचारात घेता, तसेच मंत्रीमंडळाची बैठकही सप्टेंबर महिन्यात होणार असून, या सर्व पार्श्वभुमीवर सद्यःस्थितीत कार्यरत असलेले कंत्राटदारांना दिनांक 31.10.2007 पर्यंत मुदतवाढ देणे अपरिहार्य आहे. अशा प्रकारे मुदतवाढ दिल्यास तसेच सर्वेक्षणाअंती वाढीव पोलच्या संख्येमुळे मुळ निविदा रक्कमेत खालील प्रमाणे वाढ होत आहे.

**तक्ता - अ**

| अ. क्र. | कामाचा प्रभाग | मुळ अंदाजपत्रक रक्कम रूपये | मार्च 2007 पर्यंत झालेला खर्च | एप्रिल 2007 ते ऑक्टो 2007 पर्यंत वाढीव रक्कम | सुधारीत अंदाजपत्रक रक्कम (3+5) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | **6** |
| 1. | प्रभाग - **अ** | 9,84,600/- | 9,80,924/- | 9,77,248/- | **19,61,848/-** |
| 2. | प्रभाग - **अ** | 9,74,700/- | 9,64,054/- | 9,53,408/- | **19,28,108/-** |
| 3. | प्रभाग - **ब** | 9,62,100/- | 5,97,861/- | 4,46,636/- | **14,08,736/-** |
| 4. | प्रभाग - **क** | 9,85,800/- | 8,03,229/- | 8,88,436/- | **18,74,236/-** |
| 5. | प्रभाग - **क** | 9,94,800/- | 7,82,950/- | 5,71,100/- | **15,65,900/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6. | प्रभाग - **ड** | 9,98,400/- | 10,22,148/- | 13,86,640/- | **23,85,040/-** |
| 7. | प्रभाग - **ड** | 9,86,400/- | 13,19,577/- | 16,14,338/- | **26,00,738/-** |
| 8. | प्रभाग - **इ** | 9,33,180/- | 6,33,874/- | 5,45,864/- | **14,79,044/-** |
| 9. | प्रभाग - **इ** | 8,00,000/- | 4,67,412/- | 2,90,628/- | **10,90,628/-** |
| 10. | प्रभाग - **फ** | 9,82,800/- | 10,45,017/- | 8,98,969/- | **18,81,769/-** |
| 11. | प्रभाग - **फ** | 9,98,400/- | 10,38,618/- | 10,78,836/- | **20,77,236/-** |
| 12. | सिडको एन-5 ते एन-8 | 23,44,165/- | 20,25,996/- | 8,63,681/- | **32,07,846/-** |
| 13. | एन-2, एन-3, एन-4, शिवाजीनगर | 22,41,015/- | 15,85,437/- | 2,97,852/- | **25,38,867/-** |
| 14. | सिडको एन-9 ते एन-13 | 21,81,010/- | 17,78,427/- | 6,34,847/- | **28,15,857/-** |
| 15. | वॉर्ड **क** व **इ** मधील (स्पील ओव्हर) काम | 9,99,500/- | 9,97,000/ | 4,35,000/- | **14,34,500/-** |
| | **एकुण रक्कम रूपये ..** | **1,83,66,870/-** | **1,60,42,524/-** | **1,18,83,436/-** | **3,02,50,306/-** |

सदरचा वाढीव खर्च हा सन 2007-08 या वित्तीय वर्षातील विद्युत देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षात उपलब्ध तरतुद रूपये 248.30 मधून प्रस्तावित आहे. तसेच अनुक्रमांक 15 वरील काम हे प्रभाग **क** व **इ** मधील पथदिवे देखभालदुरूस्तीचे (स्पील ओव्हर) असून, त्यासाठी सन 2007-08 प्रभाग **क** विद्युत देखभाल दुरूस्ती लेखा शिर्षकात 4.35 लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तसेच अनुक्रमांक 1 ते 11 मधील कामांच्या निविदा अटी/शर्ती प्रमाणे 12.5% सर्व्हीस टॅक्सचा समावेश सुधारीत अंदाजपत्रकात नसून, तो देयकामध्ये अतिरिक्त देण्यात येईल.

करीता दोन महिन्याच्या मुदतवाढीसह उपरोक्त कामांच्या देयकामध्ये 12.5% सर्व्हीस टॅक्स वेगळा अदा करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : शहरातील पथदिव्यांचे देखभाल दुरूस्तीचे कामासाठी निविदा प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता असल्याने, आगामी सणासुदीचे दिवस लक्षात घेता निविदा प्रक्रियेस लागणारा वेळ विचारात घेता, तसेच मंत्रीमंडळाची बैठकही सप्टेंबर महिन्यात औरंगाबाद येथे होणार असल्याने, आणि सर्वेक्षणाअंती पोल व फिटींगच्या संख्येत वाढ झाल्याने अंदाजपत्रकात होणारी वाढ योग्य आहे. सद्य:स्थितीत कार्यरत असलेले कंत्राटदारांना चार महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. यासाठी लागणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात येते. सदरचा खर्च या वर्षी ठेवण्यात आलेल्या देखभाल दुरूस्तीच्या सर्व वॉर्डाच्या एकत्रित तरतुदीतून करण्यात यावा. तसेच सदर कंत्राटदारांच्या कामांचा आढावा घेवुन जे कंत्राटदार समाधानकारकपणे काम करीत नसतील त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून पुर्वीच्या मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेऔरंगाबाद शहरातील पथदिवे कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करणेसाठी एकूण 15 कामांच्या सुधारीत आंजपत्रकांना मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे उपरोक्त अ.क्र.1 ते 14 पर्यंतच्या कामांना चार महिन्याची मुदतवाढ देण्यात येते. सदरील मुदतवाढ आगामी सणासुदीचे दिवस लक्षात घेता त्याचप्रमाणे मंत्रीमंडळ बैठकीच्या पार्श्वभूमीवर तातडीने रस्त्यावरील दिव्यांच्या देखभाल दुरूस्तीची कामे व्हावी व नागरिकांची गैरसोय होवू नये या हेतुने त्याचप्रमाणे सर्वसाधारण सभेने औरंगाबाद शहरातील पथदिव्यांच्या देखभाल दुरूस्तीच्या कामांच्या अंदाजपत्रकांना अद्याप अंतिम मान्यता दिलेली नसल्याने पर्यायाने निविदा प्रक्रीयेस होणारा संभाव्य विलंब विचारात घेता मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने मुळ अंदाजपत्रकापेक्षा केलेल्या जास्तीच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. उपरोक्त तक्ता-अ मधील दर्शविलेल्या ऑक्टोबर 2007 पर्यंतच्या सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेत माहे नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्याच्या अतिरिक्त मुदतवाढीमुळे वाढणाऱ्या रक्कम रू.37.75 लक्ष च्या वाढीव खर्चासहीत मान्यता देण्यात येते. सदरची चार महिन्याची वाढीव कामे पुर्वीच्याच कंत्राटदारांकडून त्यांच्या मान्य दराने करून घेण्यात यावीत. तसेच सदर कंत्राटदारांच्या कामांचा आढावा घेवुन जे कंत्राटदार समाधानकारकपणे काम करीत नसतील त्यांचे देखभाल दुरूस्तीचे काम उपलब्ध गुत्तेदारांकडून पुर्वीच्या मान्य दराने करून घेण्यासही अनुमती देण्यात येते.

उपरोक्त अ.क्र.1 ते 11 मधील कामांच्या निविदा व अटी शर्ती प्रमाणे सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेवर व्हॅट, सर्व्हीस टॅक्स इत्यादी करापोटी 12.5% अतिरिक्त कंत्राटदारांना त्यांच्या देयकात समावेश करून देण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 126 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.64 झांबड इस्टेट मधील खुल्या जागेत इटालियन डिझ ाईनर पेव्हींग ब्लॉक बसविणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.14,17,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत नवीन काँक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 14,17,500/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.64 झांबड इस्टेट मधील खुल्या जागेत इटालियन डिझाईनर पेव्हींग ब्लॉक बसविणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये 14,17,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 127 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि. 17 सप्टेंबर 2007 रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रमा करीता मा.मुख्यमंत्री यांचे समवेत मंत्रीमंडळातील मंत्री व इतर वरीष्ठ अधिकारी हजर राहण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने सिध्दार्थ उद्यान येथे तातडीने काही दुरूस्ती व रंगरंगोटी करणे व इतर कामे करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरील कामास्तव सा.बां. विभागाचे सन 2006-07 च्या जिल्हा दरसूची नुसार रक्कम रू.5,35,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामाची तातडी पाहता काम उपलब्ध गुत्तेदार ईराम कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने मुं.प्रां. महानगरपालिका अधिनियमाचे कलम 5 (2) (2) नुसार काम करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. 17 सप्टेंबर 2007 रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन कार्यक्रमा करीता मा.मुख्यमंत्री यांचे समवेत मंत्रीमंडळातील मंत्री व इतर वरीष्ठ अधिकारी हजर राहण्याची शक्यता असल्याने, सिध्दार्थ उद्यान येथे तातडीने काही दुरूस्ती व रंगरंगोटी करणे व इतर कामे तातडीने करणे आवश्यक आहे. सदरील काम उपलब्ध गुत्तेदार ईराम कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने मुं.प्रां. महानगरपालिका अधिनियमाचे कलम 5 (2) (2) नुसार करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या र.रू.5,35,000/- च्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद